आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ११९ । शनिवार ७ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



## अटक करण्यापूर्वी नोटीस अनिवार्य : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने आज पोलीस कारवाई आणि अटकेशी संबंधीत एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. ज्या गुन्ह्यांमध्ये कमाल ७ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे, अशा प्रकरणांमध्ये पोलिसांना थेट अटक करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत.

अटक करण्यापूर्वी आरोपीला नोटीस देणे अनिवार्य असेल, असे न्यायालयाने ठणकावून सांगितले. हा निर्णय सतेंद्र कुमार अंतिल विरुद्ध सीबीआय या प्रकरणात देण्यात आला आहे. न्या. एम.एम. सुंदरेश आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने हा निकाल सुनावला. निर्णय देताना न्यायालयाने स्पष्ट केले की,केवळ चौकशीसाठी एखाद्या व्यक्तीला अटक करता येणार नाही. अटक करण्यासाठी पोलिसांकडे ठोस आणि लेखी कारणे असणे आवश्यक आहे. जर आरोपी सहकार्य करत असेल आणि कोठडीशिवाय तपास शक्य असेल, तर अटक टाळली पाहिजे, असे निर्देश न्यायालयाने दिले.

# पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यातील आरोपींचा जामीन रद्द

### सत्र न्यायालयाचा निकाल, आरोपींच्या अटकेच्या आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** तालुक्यातील देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री गैरव्यवहार प्रकरणातील दहा आरोपींना दिलेला अटकपूर्वक जामीन अहमदनगर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश लोणे यांनी रद्द केला आहे.

आरोपींमध्ये तलाठी किरण फातले, क्रांती शुगर या खाजगी कंपनीचे चेअरमन ज्ञानेश नवले, संचालक पांडुरंग नवले, दत्तात्रय नवले, भिकू नवले,जालिंदर नवले, गुलाब नवले,शिवराज नवले, श्रीधर नवले, निवृत्ती नवले यांचा समावेश आहे.

पारनेर न्यायालयाच्या आदेशानंतर वर्षभरापूर्वी राज्य सहकारी बँक आणि क्रांती शुगर कंपनीवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाला होता. पुढे सत्र न्यायालयाने आरोपींचा रिव्हीजन अर्ज फेटाळला, त्यानंतर आरोपींनी सत्र न्यायालयाकडे अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज अटी-शर्ती नुसार मंजुर केला होता. मात्र न्यायालयाने घातलेल्या अटी - शर्तीचा भंग केल्याचा प्रकार लक्षात येताच, याप्रकरणी फिर्यादी असलेल्या पारनेर कारखाना बचाव समितीने आरोपींचा अटकपुर्व जामीन रद्द करणे कामी सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या गंभीर गुन्ह्यातील आरोपींनी अटकपूर्वक जामीनाच्या नावाखाली गैरफायदा घेऊन फिर्यादीवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता, गुन्ह्यातील महत्वाचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता, तसेच तपासात पोलिसांना सहकार्य करत नसल्याचे पुरावे फिर्यादिकडुन न्यायालया **(पान ४ वर)**

**■ तपास यंत्रणेवर दबाव....!**

गुन्हा दाखल होवून वर्षे लोटले आहे. गुन्ह्यात एकुन ४२ साक्षीदार आहेत. त्यांची यादि फिर्यादिने तपासी अधिकारी यांना देवुनही आरोपींच्या राजकिय दबावापोटी साक्षीदारांचे जबाब नोंदवले जात नाहीत.

**■ तपासी अधिकार्याची तातडीने बदली....!**

या गुन्ह्याचे तपासी अधिकारी असलेले पारनेर पोलिस ठाण्याचे निरिक्षक समीर बारवकर यांची मुदती पुर्वीच बदली करण्यात आली आहे. त्यांची ही बदली या गुन्ह्यात आरोपींना मदत न केल्याच्या कारणाने केल्याचे कारखाना बचाव समितीचे बबन कवाद, साहेबराव मोरे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे..




### लाडक्या बहिणींना केवायसी अपडेट करण्यासाठी ३१ मार्च पर्यंत मुदत वाढ

**संभाजीनगर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अनेक लाभार्थी महिलांकडून पैसे मिळाले नसल्यानं राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. ई- केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं महिलांचे पैसे थकले असल्याची चर्चा होती. अखेर महिला व बाल विकास विभागानं ई-केवायसीचं पोर्टल पुन्हा सुरु केलं आहे. आजपासून या पोर्टलवरुन ई-केवायसी दुरुस्ती ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.

लाडकी बहीण ई-केवायसी पोर्टल आजपासून सुरू करण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसी पोर्टल बंद असल्याने लाडक्या बहिणींचे पैसे थांबले होते. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केले आहे. या निर्णयामुळं लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला असून आता ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी दुरुस्ती करता येणार आहे.

# ‘मिनी मंत्रालय’ आज मतदान

## १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन दिवस लांबणीवर पडलेल्या, राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज (दि. ७) मतदान होत असून जिल्हा परिषदेच्या ७३१; तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारी २०२६ रोजी केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार होते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता उद्या (ता. ७) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडणूक होत असलेल्या जिल्हा परिषदांच्या व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या एकूण मतदारांमध्ये १ कोटी ६ लाख ३३ हजार २६९ पुरुष, १ कोटी १ लाख ८६ हजार ९६५ महिला; तर ४६८ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी एकूण २५ हजार ४७१ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी **(पान ४ वर)**



### मतदान नक्की करा

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज (दि. ७) मतदान होत आहे. या निवडणुका म्हणजे आपले गाव व परिसराचे भवितव्य ठरविणाऱ्या असतात. म्हणूनच या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या गाव व परिसराच्या उन्नतीत मोलाचे योगदान देऊ शकतो. त्याचबरोबर या निवडणुकांच्या माध्यमातून आपण लोकशाहीचा पाया बळकट करण्यातही हातभार लाऊ शकतो. त्यामुळे जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करून आपण मतदानाचा आपला बहुमोल हक्क बजवायलाच हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मी सर्व संबंधित मतदार बंधू- भगिनींना नम्रपणे आवाहन करतो.

**–दिनेश वाघमारे, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र**

# सहा राज्यसभा खासदारांच्या बिनविरोध निवडी?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सात जागा लवकरच रिक्त होणार असून, त्यासाठी होणाऱ्या निवडणुकीत राज्यातील राजकीय समीकरणे बदललेली दिसणार आहेत. सध्याच्या विधानसभेतील संख्याबळाचा विचार करता, या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट फायदा होण्याची शक्यता असून, महाविकास आघाडीला मोठा फटका बसण्याची चिन्हे आहेत. २ एप्रिल रोजी राज्यातून निवडून गेलेले सात राज्यसभा खासदार निवृत्त होत आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे डॉ. भागवत कराड आणि धैर्यशील पाटील, काँग्रेसच्या रजनी पाटील, उद्धव ठाकरे गटाच्या प्रियांका चतुर्वेदी आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या फौजिया खान यांचा समावेश आहे. या सर्वांची मुदत संपल्यानंतर तातडीने नव्या निवडणुका होणार आहेत. **(पान ४ वर)**



# संपादकीय

## धावपट्टीचे राजकारण....

भारत आणि श्रीलंका संयुक्त यजमान असलेली टी२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. नेहमीप्रमाणे कोणत्याही स्पर्धेत ज्याप्रमाणे वादविवाद होतात, त्याप्रमाणे या स्पर्धेलाही वादविवादाचे आणि राजकारणाचे गालबोट लागले आहे.

त्यालाही नेहमीप्रमाणे पाकिस्तानच जबाबदार आहे. स्पर्धेमध्ये १५ फेब्रुवारी रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील जो सामना होणार होता त्या सामन्यावर बहिष्कार घालून पाकिस्तानने क्रिकेटच्या मैदानावर राजकारण आणले आहे. खरे तर पाकिस्तानसारख्या संघाला या स्पर्धेमध्ये सहभाग घेता यावा म्हणून ही स्पर्धा संयुक्तपणे भरवण्यात आली होती.

अन्यथा ही स्पर्धा फक्त भारताच्या मैदानांवरच खेळवली जाणार होती. पण पाकिस्तानची व्हावी म्हणून श्रीलंकेला सह यजमान करण्यात आले आहे. असे असतानासुद्धा बांगलादेशला पाठिंबा देण्याच्या नादात पाकिस्तानने क्रिकेटच्या मैदानावर राजकारण आणून आपल्याच पायावर कुर्हाड मारली आहे. सध्या भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध चांगले नाहीत. या पार्श्वभूमीवर आयपीएलमधील लिलावामध्ये एका बांगलादेशी खेळाडूला सहभागी करून घेतल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने त्याला विरोध दर्शवला या खेळाडूला त्या लिलावातून आणि आयपीएलमधून बाहेर काढण्यात आले होते. त्यानंतर त्याला प्रतिसाद किंवा प्रत्युत्तर म्हणून बांगलादेश संघाने आम्ही भारतात टी२० विश्वचषक स्पर्धा खेळायला जाणार नाही अशी घोषणा केली.

सुरक्षेच्या कारणावरून आम्ही भारताचा दौरा करणार नाही, आमचे सामने इतरत्र नियोजित करावेत अशी बांगलादेशची मागणी होती. पण ऐनवेळी ते शक्य आयसीसीने बांगलादेशला या स्पर्धेतूनच बाजूला काढले आणि त्यांच्या जागी दुसर्या देशाला संधी दिली. खरेतर हा विषय येथेच संपत असताना पाकिस्तानने विनाकारण त्यामध्ये नाक खुपसले आणि बांगलादेशला पाठिंबा देण्याच्या नादात आम्हीसुद्धा भारताविरुद्धचा १५ फेब्रुवारीचा सामना खेळणार नाही अशी घोषणा केली. पाकिस्तानच्या या घोषणेला कोणताही ठोस पाया नव्हता आणि कोणतेही तत्त्व कारण हा सामना न खेळण्याची घोषणा होत असतानाच अंडर१९ विश्वचषक स्पर्धेमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये एक सामना झाला, ज्यामध्ये भारतीय युवकांनी पाकिस्तानवर मात केली.

एवढेच नाही तर १५ फेब्रुवारीलाच भारत आणि पाकिस्तान यांच्या महिलांमध्येसुद्धा एक सामना होणार आहे. जर पाकिस्तानला भारतासोबत क्रिकेटविषयक संबंध ठेवायचे नसतील तर ते सर्वच पातळीवर नकोत. पण त्यांनी सोयीस्करपणे फक्त टी२० विश्वचषक स्पर्धेतील सामना न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा पाकिस्तानलाच अनेक अर्थाने फटका बसणार आहे. एक तर त्यांना दोन गुण गमवावे लागणार आहेतच. आयसीसी आणि प्रायोजकांकडूनसुद्धा मोठ्या प्रमाणावर आर्थिक दंडही लावला जाऊ शकतो. कोणताही देश जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेमध्ये भाग घेतो तेव्हा ब्रॉड कास्टर्स, प्रायोजक आणि सहप्रयोजकांसोबतही करार असतो. कोणतेही कारण न देता संघांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होणे अपेक्षित असते.

एखादा संघ न पटणार्या एखाद्या कारणासाठी या स्पर्धेत सहभागी झाला नाही तर तो करार भंग मानला जातो आणि सर्व प्रायोजक अशा संघाविरोधात आर्थिक नुकसानभरपाईची मागणी करू शकतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील नेहमीच सर्वांना मोठ्या प्रमाणात उत्पन्न देणारा सामना असतो. जाहिरातदार ब्रॉडकास्ट कंपन्या सर्वांसाठीच हा सामना म्हणजे कमाईची मोठी संधी असते. पण पाकिस्तानने ऐनवेळी असा निर्णय घेतल्यामुळे सर्वांना मोठ्या प्रमाणात उत्पन्नाला मुकावे लागणार असल्याने त्याची भरपाई ते पाकिस्तानकडूनच वसूल करणार हे उघड आहे. या व्यतिरिक्त आयसीसीचा सदस्य असलेल्या पाकिस्तानने शिस्तभंग केल्याचे देऊन आयसीसीकडूनसुद्धा पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादले जाऊ शकतात, ज्यामध्ये द्विपक्षीय मालिका खेळण्यावर बंदी असे काही कठोर उपाय असू शकतात. पाकिस्तानला या सर्व परिस्थितीची कल्पना नाही असे नाही.

पण केवळ लोकप्रिय घोषणा करण्याच्या नादात पाकिस्तान सरकारने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला भारताविरुद्धचा सामना खेळू नये अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. पूर्वीच्या काही स्पर्धांमध्ये जरी अशा प्रकारच्या घटना घडल्या असल्या तरी एखाद्या देशाने दुसर्या देशाविरुद्ध सामना न खेळण्यामागे एखादे संयुक्तिक किंवा योग्य कारण असायचे. पाकिस्तानमधील माजी क्रिकेटपटू आणि क्रिकेटतज्ज्ञसुद्धा पाकिस्तानचा हा निर्णय त्यांना अनेक वर्षे मागे घेऊन जाणारा ठरेल असे सांगत आहेत. पण पाकिस्तानच्या विचित्र राजकारणावर त्याचा कोणता फरक पडेल असे सध्या दिसत नाही. ज्या प्रकारे भारताने आशियाई क्रिकेट चषक स्पर्धा जिंकूनसुद्धा अद्याप तो चषक पाकिस्तानने स्वतःच्याच ताब्यात ठेवला आहे, त्याच प्रकारे या टी२० विश्वचषक स्पर्धेमध्ये सुद्धा विचित्र वागणुकीच्या निमित्ताने पाकिस्तान चर्चेत राहणार हे उघड आहे.

पाकिस्तानने या निर्णयाने विजेतेपद मिळवण्याची शक्यता तर कमी केली आहेच शिवाय भविष्यातील क्रिकेट विकासालाही खो आहे. या व्यतिरिक्त आर्थिक नुकसानभरपाईच्या निमित्ताने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे कंबरडेही मोडले जाणार आहे. पाकिस्तान क्रिकेटचे आणि पाकिस्तानच्या सत्ताधार्यांचे सल्लागार जर चाणाक्ष असतील तर अजूनही या स्पर्धेत भारताविरुद्धचा सामना न खेळण्याचा निर्णय मागे घेऊन १५ फेब्रुवारीला मैदानावर उतरून क्रिकेट संघाशी सामना करणे हेच जास्त समजूतदारपणाचे ठरणार आहे. क्रिकेटच्या मैदानावर अशा राजकारण आणून आपले भले होणार नाही, हे कोणीतरी पाकिस्तानला समजावून सांगण्याची गरज आहे.

# ग्रामीण भागातील तरुणांनी उद्योग व्यवसायात आपले करिअर घडवावे: गीते

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**आश्वि** : संत गाडगेबाबा यांनी गावाकडे चाला हा अभि मंत्र दिला खेडे सुधारले तर खऱ्या अर्थानं राज्याची व देशाची प्रगती झाली असे म्हणता येईल परंतु आज शिक्षण घेऊन अनेक तरुण नोकरीच्या निमित्ताने शहराकडे वाटचाल करत असून खेडी ही ओसाड पडत आहे त्यामुळे आजच्या तरुणांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर उद्योग व्यवसाय सुरू करून गावाचा विकासात्मक कायापालट करावा असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते व जिल्हा भाजपाचे सरचिटणीस भारतराव गीते पाटील यांनी केले संगमनेर तालुक्यातील पिंपरी लौकी अजमपुर येथे गावातील तरुण श्री दीपक दातीर यांनी सुरू केलेल्या राजमाता इलेक्ट्रॉनिक्स व जनरल स्टोअर्स या दुकानाच्या शुभारंभ प्रसंगी केले पुढे बोलताना गीते म्हणाले, ग्रामीण भागाची अवस्था बिकट होत चाललेली आहे शहरांमध्ये वाढलेली गर्दी मोठी डोकेदुखी होत असून भविष्य काळात तरुणांनी शहराकडे न जाता आपापल्या गावांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीचे उद्योग व्यवसाय सुरू करून खऱ्या अर्थाने खेडे स्वयंपूर्ण करावे. तरच देश आणि राज्य प्रगतीकडे वाटचाल करीन आज खेडी ओसाड पडलेली दिसत आहे. खेडेमध्ये अनेक पद्धतीचे उपलब्ध होऊ शकतात परंतु छोट्या मोठ्या नोकरीसाठी आजचा शिकलेला तरुण हा शहराकडे आकर्षित झालेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागात




रोजगाराची उपलब्धता कमी होत असून भविष्य काळामध्ये हे खूप घातक आहे.

आज शेतीच्या माध्यमातून अनेक उद्योग व्यवसाय उभी राहिलेली आहे मात्र आजचा तरुण त्याकडे वळणे ऐवजी तो नोकरीच्या शोधात शहराकडे जाताना तरुणांनी पुढे येऊन आपले राज्य आपलं गाव कसे स्वयंपूर्ण होईल याचा विचार करणे गरजेचे आहे असे मनोगत त्यांनी व्यक्त केले या कार्यक्रमाची प्रस्ताविक पिंपरी दूध संस्थेचे चेअरमन कैलासराव दातीर यांनी केले याप्रसंगी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## डी पॉल हायस्कूलच्या मनस्वी जाधव हीचे गायन स्पर्धेत यश



**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**राहुरी** : अहिल्या नगर जिल्ह्यातील राहुरी फॅक्टरी येथील डीपॉल इंग्लिश मिडीयम हाय स्कूल मधील इयत्ता ५ ५ वीत शिक्षण घेणाऱ्या कु. मनस्वी जाधव हिने विद्यालया मार्फत घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेमध्ये मनस्वी जाधव हिने अभूतपूर्व असे यश संपादन केले या पुर्वी देखील मनस्वी जाधव हिने आपल्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालयात घेण्यात आलेल्या विवीध शालेय उपक्रमात भाग घेऊन अनेक प्रकारची पारितोषिके पटकावली आहेत.मनस्वी जाधव ही अहिल्या नगर जिल्हा पोलिस क्राईम न्यूज चीफ ब्यूरो तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सदस्य असून रयत शिक्षण संस्थेचे प्रा ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे मनस्वी ही नात असुन तिच्या या यशाबद्दल तिला शुभेच्छा दिल्या जात आहे.

# आश्वीत 'कायद्याचे राज्य' येणार का?

## नवे प्रभारी शिरसाठ यांच्यासमोर मोठे आव्हान

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**आश्वी** | राजकीय, सामाजिक आणि व्यापारी दृष्ट्या अत्यंत संवेदनशील असलेल्या आश्वी पोलीस ठाण्याची धुरा आता सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांच्या खांद्यावर आली आहे. मात्र, पदभार स्वीकारताच त्यांच्यासमोर परिसरातील फोफावलेले अवैध धंदे आणि मोकाट गुन्हेगारीला वेसण घालण्याचे मोठे उभे ठाकले आहे. त्यामुळे शिरसाठ हे आश्वीत 'खाकी'चा दरारा पुन्हा निर्माण करणार का? याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. गेल्या काही काळापासून आश्वी



आणि परिसरात कायद्याचा धाक कमी झाल्याची चर्चा उघडपणे होत आहे. अवैध व्यवसायांनी पुन्हा डोके वर काढले असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा वावर वाढल्याने सर्वसामान्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण आहे. अशा परिस्थितीत पोलीस ठाण्यात खांदेपालट झाली असून, राहुरी पोलीस ठाण्यातून आलेले सुदाम शिरसाठ यांनी पदभार स्वीकारला आहे.

**अनुभव पणाला लागणार?**

सुदाम शिरसाठ यांचा यापूर्वीचा राहुरी येथील कार्यकाळ चांगला झाला आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यात आणि गुन्हेगारांवर वचक ठेवण्यात यश आल्याचे मानले जाते. मात्र, आश्वीचे 'मैदान' वेगळे आहे. राजकीय हस्तक्षेप आणि स्थानिक दबावगटांचा सामना करत कायद्याची कडक अंमलबजावणी करणे ही त्यांच्यासाठी कसोटी ठरणार आहे.

**नागरिकांच्या स्पष्ट अपेक्षा**

नव्या अधिकाऱ्याकडून ग्रामस्थांना केवळ आश्वासने नकोत, तर ठोस कृती हवी आहे. गावागावात लपून-छपून सुरु असलेले अवैध धंदे तातडीने बंद झाले पाहिजेत. रस्त्यावर आणि चौकात होणारी 'भाईगिरी' मोडून काढली पाहिजे. आणि हाणामारीच्या घटनांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

**'ॲक्शन मोड'मध्ये येणार का?**

शिरसाठ हे केवळ खुर्ची सांभाळणार की पहिल्या दिवसापासूनच 'ॲक्शन मोड'मध्ये येऊन गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. जर त्यांनी पहिल्या काही दिवसांतच आपल्या कामाची चुणूक दाखवली, तरच आश्वीत कायद्याचे राज्य प्रस्थापित होईल, अन्यथा परिस्थिती 'जैसे राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

## दहा गावे पाणीपुरवठा योजना समितीच्या अध्यक्षपदी अलका माने

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**राहुरी** ;राहुरी व नगर तालुक्यातील गावांसाठी स्थापन करण्यात आलेल्या वरवंडी व इतर दहा गावे पाणीपुरवठा योजना समितीच्या अध्यक्षपदी धामोरी बु.च्या सरपंच अलकाताई रामदास माने यांची, तर उपाध्यक्षपदी नांदगावचे सरपंच सखाराम मालू सरक यांची निवड करण्यात आली आहे.

राहुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुरेश तायडे यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी गावातील सरपंचांची बैठक घेण्यात आली. यावेळी सचिवपदी ग्रामविकास संतोष राठोड यांची निवड जाहीर करण्यात आली.

समिती सदस्य म्हणून कैलास पवार, मुक्ताबाई गिऱ्हे, भाऊसाहेब कोळेकर, अण्णासाहेब माळी, जिजाबाई काळे यांचा समावेश आहे. या योजनेत



वरवंडी, बाभूळगाव, धामोरी बु. व खुर्द, खडांबे बु. व खुर्द, नांदगाव, देहरे व शिंगवे नाईक आदी गावांचा समावेश आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे विविध मान्यवर व अभिनंदन केले.

# शाळेच्या आवारात तंबाखू विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**राहुरी** : स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या एका इसमावर राहुरी बुधवारी (४ फेब्रुवारी) धडक कारवाई केली. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल संतोष साळुंके यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. गणपतवाडी, मानोरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या १०० मीटर परिसरात आरोपी नानाभाऊ तुकाराम शेलार (वय ५५ वर्षे, रा. गणपतवाडी) तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकून आरोपीकडून १७० रुपये किमतीचे 'गायछाप' तंबाखूचे २० पुडे आणि ९६ रुपये किमतीचे 'रॉयल' तंबाखूचे १२ पुडे, असा एकूण २६६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.आरोपीविरुद्ध 'सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ उत्पादने (जाहिरात व प्रतिबंध आणि व्यापार व्यवहार व उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनिमय) अधिनियम २००३' (उजढझअ) च्या कलम ६(ब) आणि २४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पोलीस कॉन्स्टेबल संभाजी बडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# 'जलसंपदा'च्या राज्यस्तरीय पंचम क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांनी लोणीचे मैदान गाजणार !

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**प्रवरानगर** : जलसंपदा विभागाच्या वतीने लोणी येथे दि. ७ ते ९ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय ,,"पंचम क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे" आयोजन करण्यात आले आहे.जलसंपदा विभागाच्या सर्व महामंडळाच्या अंतर्गत येणारे अधिकारी आणि कर्मचार्याचा सहभाग या स्पर्धेमध्ये आहे.'

'खेळात सशक्त, सेवेत समर्थ"असे घोषवाक्य यंदाच्या स्पर्धेचे आहे. जलसंपदा विभागाच्या वतीने दरवर्षी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.यंदाच्या स्पर्धाचे यजमान पद गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत अहील्यानगर जिल्ह्याने स्विकारले असून लोणी आणि शिर्डी येथे या स्पर्धाच्या नियोजनाची जय्यत तयारी विभागाने सुरू केली आहे. स्पर्धाचे उद्घाटन दि.७ फेब्रुवारी २०२६ सकाळी ८वाजता लोणी येथील पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर होणार असून जिल्ह्यातील अर्जून पुरस्कार प्राप्त खेळाडू भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार पंकज शिरसाठ, शिवछत्रपती पुरस्काराने,शिवछत्रपती पुरस्कार विजती खो खो पटू श्वेता गवळी बेसबॉल पटू अक्षय आव्हाड यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय स्पर्धाचे उद्घाटन होणार असून जलसंपदा मंत्री तथा अहील्यानगरचे मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार्या शानदार उद्घाटन सोहळ्यास मंत्री गिरीष महाजन यांच्यासह विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिपक कपूर,विभागाचे सचिव डॉ संजय बेलसरे यांच्यासह पाचही महामंडळाचे कार्यकारी संचालक उपस्थित राहाणार आहेत. तीन दिवसांच्या या स्पर्धेत सर्व अधिकारी कर्मचारी क्रिकेट, कबड्डी,टेबल टेनिस, व्हॉलीबॉल टेबल टेनिस बुध्दीबळ,कॅरम, ॲथेलॅटिक्स, जलतरण,या प्रकारांच्या स्पर्धामध्ये जलसंपदा विभागाचे मंत्रालयीन, महामंडळाच्या अंतर्गत येणार्या विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी सहभागी होणार आहेत. लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ विखे पाटील महाविद्यालय आणि सैनिकी स्कूलच्या मैदानावर या स्पर्धा खेळविल्या जाणार आहेत. स्पर्धेचा समारोप ९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिर्डी येथील शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या होणार असून या समारंभास जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त धनुर्विद्या प्रशिक्षक डॉ. शुभांगी दळवी,शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त वेटलिफ्टींग पटू कोमल वाकळे आंतरराष्ट्रीय सॉफ्ट खेळाडू फिजा सय्यद यांच्या उपस्थितीत होणार असून समारंभास जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील मंत्री गिरीष महाजन उपस्थित राहाणार आहेत.

तीन दिवसांच्या स्पर्धांची विभागाने सुरू केलेली तयारी अंतिम टप्प्यात नियोजनासाठी अहील्यानगर जलसंपदा विभागाने समित्या गठीत केल्या असून ,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या क्रिडा विभागाचे सहकार्य संयोजन समितीला मिळत आहे.

## भोकरच्या तंटामुक्त गांव समिती अध्यक्षपदी रामदास शिंदे

**टाकळीभान** -- श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील 'तंटामुक्त गाव' समितीच्या अध्यक्षपदी रामदास दाजीबा शिंदे यांची तर उपाध्यक्षपदी आर,पी,आयचे सुरेश पेत्रस अमोलिक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

गेल्या काही वर्षापासून येथील तंटामुक्त गाव समीतीचे अध्यक्षपद रिक्त होते. भोकरच्या अजेंड्यावर तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष निवडीचा विषय घेण्यात आला. यावेळी भाजपाचे भाऊराव सुडके यांनी अध्यक्षपदासाठी रामदास दाजीबा शिंदे यांच्या नावाची सुचना मांडली त्यास माजी उपसरपंच सागर आहेर यांनी अनुमोदन दिले. तर उपाध्यक्षपदासाठी सुरेश पेत्रस अमोलिक यांच्या नावाची सूचना प्रताप पटारे यांनी मांडली त्यास उपसरपंच गिरीष मते यांनी अनुमोदन दिले. निवडी सर्वानुमते बिनविरोध झाल्याचे लोकनियुक्त सरपंच शितल पटारे यांनी ग्रामसभेत जाहीर केले. तंटामुक्त गांव समितीच्या माध्यमातून गावातील तंटे गावात मिटवून भोकर गाव 'तंटामुक्त' करण्यासाठी विशेष प्रयत्न करून कुठलाही भेदभाव न करता निभीडपणे न्याय देवुन गाव आदर्श करण्याचे काम आम्ही करणार असल्याचे यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्याक्षांनी यावेळी सांगीतले.

## हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला.

बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या




बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या.

दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आक्रांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# चिंचोली फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद व पोष्टर स्पर्धा




**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**लोणी** : : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (महिला) चिंचोली सिन्नर येथे येथे औषध शोध आणि विकासातील प्रगती या विषयावर दोन राष्ट्रीय स्तरावरील परिषद तसेच पोस्टर व ओरल स्पर्धा पार पडली. अशी माहीती प्राचार्या डॉ.चारुशिला भंगाळे यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील आणि असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. मिलिंद उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल टीचर्स ऑफ इंडिया यांच्या आयोजित करण्यात आली होती. परिषदेत औषध संशोधनातील नव्या संकल्पना, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर, डिझाइनडरे गुणवत्ता, इन-सिलिको डिझाईन, क्लिनिकल रिसर्च तसेच आधुनिक औषध वितरण प्रणाली यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी डॉ. अमोल शांतिदूत यांनी क्लिनिकल संशोधनातील प्रगत आवश्यकता व पर्याय तसेच फार्मास्युटिकल उद्योगातील करिअर संधी या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. लोढा यांनी आण्विक डॉकिंग या विषयावर सत्र घेतले. तसेच डॉ. के. मंगथायारू यांनी कार्यात्मक अन्न मॅट्रिसेस या विषयावर व्याख्यान दिले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग व महिला सक्षमीकरणातूनच शेतीचे भविष्य उज्ज्वल

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते जिल्हास्तरीय 'कृषीपर्व' महोत्सवाचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कृषी प्रक्रिया उद्योगांची उभारणी आणि महिला सक्षमीकरण या माध्यमातूनच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. कृषी विभाग, आत्मा, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर व एक्स्पो इंडियन ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने केडगाव रोडवरील नेमाने इस्टेट येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी महोत्सव 'कृषीपर्व' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, स्वामी विज्ञानानंद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उमेदचे. शहर जिल्हाध्यक्ष भाजपा अनिल मोहिते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आत्माचे प्रकल्प संचालक राजाराम गायकवाड डीआरडीए च्या प्रकल्प संचालक मंजुषा ठवकर , विनायक देशमुख, व्यवस्थापक सोमनाथ जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.





### कृषीपर्व महोत्सवाची वैशिष्ट्ये

केडगाव रोडवरील नेमाने इस्टेट येथे ५ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत कृषीपर्व महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात आधुनिक कृषी अवजारे, ड्रोन तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग तसेच महिला बचत गटांच्या उत्पादनांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. पालकमंत्र्यांनी विविध स्टॉल्सना भेट देत पाहणी केली. यावेळी महिला शेतकरी पुरस्कार, उमेद अभियानातील पुरस्कार, शासकीय रुग्णालय व क्रीडा पुरस्कार तसेच शेतकऱ्यांना विहिरींसाठीच्या अनुदानाचे वितरण करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या व्हॉट्सप चॅटबोटचाही शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास शेतकरी, महिला बचत गट सदस्य, कृषी उद्योजक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, शेती क्षेत्रात सातत्याने होणारे बदल व नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषीपर्वसारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून, प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत त्याचा लाभ पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

केंद्र शासनाने यंदा कृषी क्षेत्रातील गुंतवणूक आठ टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला असून, राज्यात २५ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. राहुरी येथील कृषी विद्यापीठाच्या जागेवर फळ प्रक्रिया उद्योग सुरू करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली असून, हा उद्योग जिल्ह्यात सुरू झाल्यास फळपीक उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. विषमुक्त शेती व दुष्काळमुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. साकळाई योजनेअंतर्गत १ हजार ८०० कोटी रुपयांच्या निधीतून सिंचनाची कामे सुरू असून, कुकडी कालव्याचे नूतनीकरण, मुळा धरणाची साठवण क्षमता वाढ, तसेच गोदावरी नदीवरील सिंचन प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, भारताची अर्थव्यवस्था कृषीवर आधारित असून, शासनाच्या विविध योजनांमुळे शेती क्षेत्र अधिक सक्षम होत आहे. कृषीपर्व हे शेतकऱ्यांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान व संधींचे व्यासपीठ ठरेल. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी कृषीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे सांगत, कृषी प्रक्रिया उद्योग व महिला बचत गटांना प्राधान्य देत शासन योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असल्याचे नमूद केले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, उमेदच्या माध्यमातून जिल्ह्यात ३ लाख २५ हजार महिला संघटित झाल्या असून, १ लाख ३३ हजार महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. उमेद मार्टमध्ये बचत गटांच्या १८० उत्पादनांची नोंदणी करण्यात आली असून, ही उत्पादने घरबसल्या खरेदी करता येतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले. ५ ते ९ फेब्रुवारी दरम्यान महोत्सव सुरू राहणार असून ग्राहकांनी शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीचा लाभ घ्यावा असे आवाहन बोराळे यांनी केले. आभार आत्म्याचे प्रकल्प संचालक राजाराम गायकवाड यांनी मानले.

## द • ख • ल

### दलित पँथर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी मीराताई जाधव



**नेवासा** : पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी स्थापित केलेल्या दलित पँथर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी नेवासा तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगरच्या दलित बहुजन चळवळीतील समाजसेविका मीराताई भास्करराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दलित पँथरच्या महासचिव डॉ. संगीता विष्णू ढसाळ यांनी मिराताई जाधव यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. निवडीबद्दल बद्दल त्यांचे आदर्शगाव सुरेशनगरचे माजी सरपंच पांडुरंग उभेदळ, दलित बहुजन चळवळीचे नेते सुनील वाघमारे, मार्गदर्शक गणपतराव मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

### विठ्ठल विखे यांना पीएच.डी. प्रदान



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सर विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एस.व्ही. आय.टी.), नाशिक येथील प्रा. विठ्ठल केरुनाथ विखे यांना ए.पी.जे. अब्दुल कलाम युनिव्हर्सिटी, इंदोर यांच्याकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.त्यांना डॉ.दीपल अग्रवाल आहे. त्यांनी आपले संशोधन ग्रीन सिंथेसिस पद्धतीने नॅनो कणांचे संश्लेषण या विषयावर पूर्ण केले आहे. हे संशोधन पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून रसायनशास्त्र व नॅनो-तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे आहे.

### आठवडे बाजारातील कर कमी करण्याची भाजीपाला व्यापाऱ्यांची मागणी

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील दर सोमवारी मोठा आठवडे बाजार भरतो. या बाजारामध्ये करपावतीसाठी बाजारात बसणाऱ्या भाजीपाला व अन्य व्यापाऱ्यांकडून बैठक व्यवस्थेसाठी ग्रामपंचायत कडून लिलाव घेऊन नेमलेल्या व्यक्तीमार्फत करवसुली केली जाते. भाजीपाला व्यापाऱ्यांकडे वेगळ्या प्रकारचा वाणाचा भाजीपाला असतो. त्याप्रमाणे दहा रुपये वाणाप्रमाणे करपट्टी आकारली जाते. एखाद्या शेतकऱ्याकडे पाच, सहा प्रकारचे भाजीपाला असेल तर त्याला ५०, ६० रुपये करपट्टी भरावी लागते. ती जास्त असून व्यापाऱ्याच्या तराजू काट्याप्रमाणे विक्रेत्यांकडून करपट्टी आकारणी करावी तसेच करपट्टी वसूल करणारे अरे रावीची भाषा करत दमदाटी करून करपट्टी वसूल करतात त्यामुळे वसुली करणारे व छोटे मोठे व्यापारी यांच्यामध्ये कायम वाद होऊन खटके उडतात. त्याचप्रमाणे भरलेल्या रकमेची कर पावती दिली जात नसल्याची तक्रार आहे.

श्रीरामपूर सारख्या ठिकाणी देखील दहा ते पंधरा रुपये बाजारातील व्यापाऱ्यांकडून करपट्टी आकारणी केली जाते. टाकळीभान या ठिकाणी चुकीच्या पद्धतीमुळे जास्त रकमेचा भुर्दंड बाजारातील छोट्या मोठ्या भाजीपाला व इतर विक्रेत्यांना बसतो. त्यामुळे वसुली करणाऱ्यांनी भाजीपाला वाणाप्रमाने वसुली न करता प्रत्येक व्यापाऱ्याकडून तराजू काट्याप्रमाणे सरसकट दहा रुपये करपट्टी आकारणी करावी. या चुकीच्या वसुलीच्या धोरणामुळे टाकळीभान बाजारामध्ये बसण्यास छोटे मोठे व्यापारी कमी होत असून इतर आसपासच्या खेडेगावांमध्ये बाजार वाढत आहेत. तरी या वसुलीच्या धोरणामध्ये बदल करावा, अशी मागणी येथील भाजीपाला विक्रेत्या व्यापारी लताबाई खंडेराव गायकवाड यांनी केली आहे.

# ठेकेदारांनी कामे अपूर्ण ठेवल्यास ब्लॅकलिस्ट करा : आ. खताळ

संगमनेर : संगमनेर तालुक्यात परिवर्तन झाल्यानंतर काही ठेकेदार राजकीय हेतूने तसेच आमदारांना बदनाम करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक विकासकामे अपूर्ण ठेवत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापुढे कोणत्याही ठेकेदाराने कामे वेळेत पूर्ण केली नाहीत किंवा अपूर्ण ठेवून सर्वसामान्य जनतेला त्रास दिल्यास अशा ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्यात येईल. वेळप्रसंगी त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे (ब्लॅकलिस्ट) सक्त निर्देश आमदार अमोल खताळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. काही ठेकेदारांनी स्वतः ची मक्तेदारी निर्माण करून एकाच वेळी चार-पाच कामे स्वतःकडे ठेवली होती. मात्र, ही कामे दर्जाहीन झाल्यामुळे वारंवार रस्त्यांच्या समस्या निर्माण होत आहेत.



> जे ठेकेदार दर्जेदार काम करत नाहीत, त्यांचा सविस्तर अहवाल तयार करण्यात यावा. तसेच ज्या ठेकेदारांच्या रकमा शासनाकडे जमा आहेत, त्या कामांच्या नव्याने निविदा काढून रस्त्यांची कामे लवकरात लवकर आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत. ज्या ठिकाणी अडचणी येतील, त्या ठिकाणी या तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन.
>
> **अमोल खताळ (आमदार)**

या पार्श्वभूमीवर संगमनेर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कामे करताना येणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, उपविभागीय अभियंता काशिनाथ गुंजाळ, संगमनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रशांत सिनारे, पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता हेमंत चव्हाण यांच्यासह दोन्ही विभागांचे उपअभियंते उपस्थित होते. दरम्यान, नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळाकडे जाणारा निळवंडे-जांभुळवाडी फाटा, वडगावपान फाटा-तळेगाव-अकोले रस्ता, शहरातील जीवन विमा महामंडळ (एलआयसी) इमारतीजवळील रस्ता तसेच तालुक्यातील इतर अनेक रस्त्यांवर पावसामुळे मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे.

या रस्त्यांवरून वाहनचालकांना प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून या सर्व रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मात्र, ठेकेदारांकडून वेळेवर कामे पूर्ण केली जात नाहीत. त्यामुळे अपूर्ण असलेल्या सर्व रस्त्यांची कामे लवकरात लवकर आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून घ्यावीत, अशा स्पष्ट सूचना यावेळी आमदार अमोल खताळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

## ग्रामीण भागाच्या मूलभूत समस्या सोडविणार : आ. लंघे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जनतेने दिलेल्या संधीचे सोने करून ग्रामीण भागातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी माझा नेहमीच प्रयत्न राहणार आहे. त्यादृष्टीने वाटचाल सुरु केलेली असून तालुक्यातील प्रत्येक गावाची मूलभूत समस्या सोडविण्यासाठी आपण नेहमी कटीबद्ध राहू असा विश्वास आमदार विठ्ठलराव लंघे यांनी व्यक्त केला. तालुक्यातील एका गावात विविध विकास कामांचे भूमिपूजन आ. लंघे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. तेलकुडगाव येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलच्या अध्यक्षा सुमतीताई साहेबराव घाडगे पाटील या होत्या. ह.भ.प. अमोल महाराज घाडगे, गटविकास अधिकारी संजय लखवाल, अंकुश काळे, बबनराव पिसोटे, कौठयाचे सरपंच प्रमोद गजभार, सरपंच सतीशराव काळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### धानोरेतील दिघे वस्ती येथे कानिफनाथ महाराज मंदिर उभारणीस प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील धानोरे गावातील दिघे वस्ती येथे श्री कानिफनाथ महाराजांच्या भव्य मंदिर उभारणीचा शुभारंभ ध्वजरोहण करून उत्साहात करण्यात आला. मंदिर परिसरात उभारण्यात येणारा ९१ फूट उंच ध्वज विधिवत फडकविण्यात आल्याने गावात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक ठरणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राहुल बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या कार्यात नाथसंप्रदायातील सिद्धपुरुष कानिफनाथ महाराजांच्या स्मरणार्थ उभारले जाणारे मंदिर भविष्यात आध्यात्मिक ऊर्जा, संस्कार आणि सामाजिक ऐक्याचे केंद्र ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. ध्वजरोहणावेळी मंत्रोच्चार, आरती आणि प्रसाद वितरणाने वातावरण अधिकच भारावले. ह.भ.प. महंत दत्तगिरीजी महाराज (मठाधिपती, उब्रेश्वर देवस्थान) यांची प्रमुख उपस्थितीत व श्री तुकाराम सखाराम भांड सर यांच्या हस्ते ध्वजरोहण पार पडले.

# नेवासा येथे वडार समाज बांधवांच्या कावड यात्रेचे सर्वधर्मीयांकडून उत्स्फूर्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा नगरीचे ग्रामदैवत असलेल्या श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त शुक्रवारी पहाटेच्या सुमारास यात्रेच्या मुख्य दिवशी श्री मोहिनीराज की जयअसा जयघोष करत वडार समाज बांधवांच्या वतीने प्रवरासंगम येथून पायी चालत आलेल्या कावड यात्रेचे नेवासेनगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी कावडीने आणलेल्या पवित्र गंगाजलाने मोहिनीराजांच्या उत्सवमूर्तीस जलाभिषेक घालण्यात आला. प्रवरासंगम येथून आलेल्या या कावड यात्रेचे फटाक्यांच्या आतषबाजीने व तोफांच्या सलामीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष शालिनीताई सुखदान यांनी पंचारती ओवाळून कावडीचे पूजन केले तर जनसेवक अँड. संजय सुखदान, नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांच्या समवेत शहरातील सर्व नगरसेवक व यात्रा कमिटी सदस्यांच्या उपस्थितीत कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी कावड यात्रेचे मार्गदर्शक दत्तात्रय लष्करे,, माजी नगराध्यक्ष सतीश पिंपळे, शिवसेनेचे युवा नेते बिट्टू लष्करे, माजी नगरसेवक अंबादास इरले, इंजिनियर शामभाऊ डोकडे, नगरसेवक संभाजी धोत्रे, स्वप्नील मापारी, निरंजन डहाळे, राजूभाऊ काळे, जालिंदर गवळी, अनिल शिंदे, महेश मापारी, अभयकुमार गुगळे, वडार सोसायटीचे चेअरमन सुरेश लष्करे, दीपक धोत्रे, कैलास ईरले, साईनाथ लष्करे, पुणे येथील रमेश धोत्रे, मुकींदा आळपे आदींनी हार घालून कावडीचे पूजन केले.



नेवासा येथील ग्रामदैवत श्री मोहिनीराज यात्रेच्या निमित्ताने कावडीचे पूजन करतांना उपनगराध्यक्ष शालिनीताई सुखदान, नंदकुमार पाटील, अँड. संजय सुखदान, सभापती नंदकुमार पाटील नेवासा येथील भाविक तर उत्सव मूर्तीस अभिषेक घालतांना कावड यात्रेतील युवक. **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

मोहिनीराज महाराज की जय असा जयघोष करत पाकशाळेत असलेल्या उत्सव मूर्तीला जलाभिषेक घालण्यात आला. तर पायी कावड घेऊन आलेल्या मानकऱ्यांचा श्री मोहिनीराज देवस्थानच्या वतीने भालचंद्र बडवे, जयेश बडवे, रविंद्र जोशी, जयंत देवचक्के, रविंद्र मुनोत यांनी स्वागत केले. या अगोदर निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे यांच्या हस्ते उत्सवमूर्तीची सपत्नीक मानाची पूजा करण्यात आली.

## जाहीर सूचना

FlaresEnergyLLPकंपनीचाइलेक्ट्रिकलकॉन्ट्रॅक्टर मस्टर बुक (M.C. No. 328320571531072024) दिनांक २८/०१/२०२६ रोजी राहाता-साकुरी परिसरात प्रवासादरम्यान हरवलेला आहे.

सदर मस्टर बुकचा गैरवापर झाल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही. मस्टर बुक आढळल्यास संपर्क : ८३७१००२००, पत्ता : Behind Honda Showroom, Sakuri, Rahata.

# नेवासा येथे संत नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा येथे संत ज्ञानेश्वर महाराज रस्त्यावर संत शिरोमणी श्री नरहरी महाराजांची पुण्यतिथी रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात यांच्या प्रवचन सोहळयाने व महाप्रसाद वाटपाने साजरी करण्यात आली. संत नरहरी महाराज देवस्थान व सुवर्णकार समाज यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यतिथी सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.





यावेळी संत नरहरी महाराज देवस्थान अध्यक्ष व विश्वस्त व सुवर्णकार समाज बांधवांच्या वतीने आयोजित पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,जेष्ठ नेते किसनराव गडाख पाटील, उद्योजक प्रभाकरराव शिंदे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,विजय दहिवाळकर, नगरसेवक निरंजन डहाळे,हरि महाराज भोगे यांच्या हस्ते संत नरहरी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, उद्योजक प्रभाकर शिंदे, डॉ.करणसिंह घुले यांनी संत नरहरी महाराजांचे जीवनकार्य विषद करून पुण्यतिथी निमित्ताने शुभेच्छा दिल्या. सुवर्णकार समाज संघटना व नरहरी महाराज देवस्थान अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने उपस्थित संत महंतांचे संतपूजन व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

जेष्ठ पत्रकार अशोकराव डहाळे यांनी आलेल्या संत मंडळींसाज मान्यवर अतिथींचे स्वागत केले. नगरसेवक निरंजन डहाळे यांनी प्रास्ताविक केले यावेळी कै. मंगल रमाकांत सोनार यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपये देणगी देण्यात आली तर राजेंद्र आंबिलवादे यांच्याकडून कडून एक लाख रुपये अन्नदान करीता देण्यात आले.

## दरपत्रक सूचना

### राहुरी नगरपरिषद, राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर

जा.क्र.का.वि ०८/४२२/७६६/२०२६ — दिनांक ०६/०२/२०२६

मा. मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद यांचेकडून महिला व बालकल्याण समितीअंतर्गत शहरातील महिलांना गृहउपयोगी वाण (वाटी) व राहुरी नगरपरिषदेच्या सभागृहाकरिता विविध महापुरुषांचे फोटो फ्रेमसह पुरविणे कामी सक्षम पुरवठादार / नोंदणीकृत व अनुभवी संस्था यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाना रक्कम | फॉर्म फी १८% G.S.T सह |
|---|---|---|---|---|
| १ | राहुरी नगरपरिषद महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील महिलांसाठी गृहउपयोगी वाण (वाटी) पुरविणे | | १०००/- | ५००/- |
| २ | राहुरी नगरपरिषदेच्या सभागृहाकरिता विविध महापुरुषांचे फोटो फ्रेमसह पुरविणे | | १०००/- | ५००/- |

नियम व अटी -

१. कोरे निवीद फॉर्म दिनांक ०९/०२/२०२६ ते दिनांक १२/०२/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत स्वामी विवेकानंद वाचनालयात मिळतील.
२. मोहोरबंद निविदा दिनांक १३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत नागरी सुविधा केंद्रात स्वीकारल्या जातील.
३. प्राप्त निविदा दिनांक १६/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. संबंधित मक्तेदार / प्रतिनिधी यांच्या समक्ष मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात अथवा मे. सभेत उघडल्या जातील.
४. निविदा इसारा रक्कम रोख स्वरुपात भरावी लागेल.
५. निविदे संदर्भात सविस्तर माहिती नगरपरिषदेचे स्वामी विवेकानंद वाचनालयात समक्ष मिळेल.
६. कोणतेही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहे.

(अभिजित हराळे) मुख्याधिकारी — (श्री. गजानन सातभाई) उपाध्यक्ष — (श्री. भाऊसाहेब मोरे) अध्यक्ष

## जाहीर नोटीस

जावक क्रमांक २४८/२०२५

श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायालयात

जन्म नोंद अर्ज क्र. २४८/२०२५.

नेमलेली तारीख -

श्री. मल्हारी रामू पांडूळे, रा. भावडी, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर

**विरुध्द**

ग्राम पंचायत भावडी नगरपरिषद श्रीगोंदा ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर

या व्दारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार श्री. मल्हारी रामू पांडूळे यांची आई कै. सईबाई रामु पांडुळे यांचा मृत्यू मौजे भावडी, ता. श्रीगोंदा येथे झाला आहे. सदर व्यक्तीची मृत्यू नोंद ग्रामपंचायत भावडी ता श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथे आढळुन येत नाही. म्हणुन सदर व्यक्तीने मृत्यू नोंद होणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे मृत्यू नोंद होणबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर वकीलासह हजर होऊन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजुन सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील याची नोंद घ्यावी. आज दि. १२/०१/२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का) तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा

(पान १ वरुन)

## पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यातील आरोपींचा जामीन रद्द

समोर ठेवण्यात आले. सत्र न्यायालयाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन आरोपींना मंजुर केलेल्या अटकपूर्व जामीनाचे संरक्षण - काढुन घेतले. आणि आरोपींना तातडीने अटक करून पुढील तपासाचे आदेश पोलिसांना दिलेले आहेत. याप्रकरणी सुमारे ४८ बनावट सातबारा उतारे तयार करणारा श्रीगोंदा - विसापुर येथे सध्या कार्यरत असलेला तलाठी किरण फातले याचाहि अटकपूर्व जामीन जामीन न्यायालयाने रद्द केला आहे. सदर प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश लोणे यांचे समोर झाली, कारखाना बचाव समितीची बाजु अँड. रामदास घावटे, अँड. सुदाम साठे, अँड. उन्मेश चौधरी यांनी, अँड. सोमनाथ गोपाळे मांडली.

## 'मिनी मंत्रालय' आज मतदान

सुमारे १ लाख २८ हजार इतक्या मनुष्यबळाची व्यवस्था केली आहे. त्यात सुमारे १२५ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२५ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या २५ हजार ४७१ मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट आणि १ लाख १० हजार ३२९ बॅलेट युनिटचा समावेश आहे. त्यासाठी सर्व सबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका नेहमी एकाच वेळी घेण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराला एक मत जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागासाठी आणि एक मत पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी द्यावे लागते. जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट) मतदान यंत्रावर म्हणजे बॅलेट युनिटवर (बीयू) पांढऱ्या रंगाची; तर पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी बीयूवर गुलाबी रंगाची मतपत्रिका असते. उमेदवारांची संख्या कमी असल्यास एकाच बीयूवर या दोन्ही मतपत्रिका असतात; परंतु उमेदवारांची संख्या अधिक असल्यास आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त बीयूचा वापर केला जातो.

एकूण जागा आणि उमेदवार

सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

## सहा राज्यसभा खासदारांच्या बिनविरोध निवडी?

२०20 मध्ये या सात जागांसाठी निवडणूक झाली होती, तेव्हा राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. त्या काळात विधानसभेतील संख्याबळाच्या जोरावर महाविकास आघाडीने चार जागा जिंकल्या होत्या. मात्र, सध्या राज्यातील राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. सत्तांतरानंतर महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे आमदारसंख्येचे गणित मोठ्या प्रमाणात ढासळले आहे. विधानसभेतील बदललेल्या आकड्यांमुळे महाविकास आघाडीला यावेळी चार जागा मिळवणे शक्य नसल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. उपलब्ध संख्याबळ पाहता, आघाडीला केवळ एकाच जागेवर समाधान मानावे लागू शकते. दुसरीकडे, भाजप आणि त्यांच्या सहयोगी पक्षांची ताकद वाढल्याने बहुतेक जागांवर त्यांचे उमेदवार निवडून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यसभेची ही निवडणूक केवळ जागांची नसून, ती राज्यातील बदललेल्या राजकीय शक्तिसमीकरणांचे प्रतिबिंब मानली जात आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे सत्ताधारी तसेच विरोधकांचे लक्ष लागून राहिले आहे. पुढील काही दिवसांत उमेदवारांची नावे समोर येण्याची शक्यता आहे.

राज्यसभेच्या ६ जागा बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्याच्या संख्याबळानुसार महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर उर्वरित ६ जागा महायुतीच्या वाट्याला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अजित पवारांच्या निधनानंतर सध्याच्या बळानुसार १ जागा तर शिवसेनेला देखील १ जागा आणि उर्वरित ४ जागा भाजपच्या वाट्याला जाणार आहेत. विधानसभेतील सध्याच संख्याबळ पाहता राज्यसभेसाठी उमेदवाराला ३७. ५ मतांची गरज असल्याची सूत्रांची माहिती आहे.

# समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये ऊर्जा २.० या मेगा स्पोर्ट उपक्रमाचा जल्लोष

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**कोपरगाव :** विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'ऊर्जा २.0' या मेगा स्पोर्ट्स उपक्रमाचे आयोजन समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली येवले नगरीतील प्रसिद्ध युवा उद्योजक सम्राट वर्मा, सौ.हिमांशी सम्राट वर्मा, वैजनाथ लोणगावकर, मंगल लोणगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. प्रसंगी समता इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रत्येक प्रात्यक्षिकातून ऊर्जेचा जल्लोष अनुभवायला मिळाला.

प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ड्रोनच्या सहाय्याने समता इंटरनॅशनल स्कूलचा ध्वजाचे ध्वजारोहण आगळ्या वेगळ्या पद्धतीने करण्यात तदनंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली घोडेस्वारी व शिस्तबद्ध परेड कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. अचूक रचना, काटेकोर नियोजन आणि शिस्तबद्ध पावले पाहून उपस्थित पालकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समता इंटरनॅशनल स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती संदीप कोयटे यांनी केले. त्या म्हणाल्या की, समता इंटरनॅशनल स्कूल फक्त पुस्तकी अभ्यासक्रमासाठी मर्यादित नसून कला गुणांना वाव देणारी तत्पर शिक्षण संस्था आहे. त्यामुळेच समता सीबीएसई अंतर्गत होणाऱ्या बोर्ड परीक्षेत तसेच राज्य,जिल्हा तालुका स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील विविध क्रीडा प्रकारात देखील झळकते. समताचे नवनवीन उपक्रम हे विद्यार्थी केंद्रित असून समता विद्यार्थ्यांची ध्येय व स्वप्ने पूर्ण करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. स्वतःचे उज्वल भविष्य घडविणारे विद्यार्थी समता आहेत.

मार्च पासनंतर सादर केलेली झांकी व बाईक रॅली कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.सामाजिक संदेश व राष्ट्रप्रेम अधोरेखित करणाऱ्या झांक्यांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधले, तर बाईक रॅलीतील नियंत्रण, समन्वय आणि आत्मविश्वासामुळे मैदानात टाळ्यांचा कडकडाट झाला होता. यानंतर मान्यवरांचा सत्कार व विविध क्रीडा तसेच सहशालेय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ पडला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्राचार्य समीर अत्तार यांनी मानले. त्यांनी खेळ हे शिस्त, संघ भावना व नेतृत्वगुण विकसित करणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

**आत्मविश्वास, धैर्य व सुसंस्कृतपणा यांचा संगम कला आणि हस्तकला, विविध क्रीडा प्रकार, शैक्षणिक मूल्यांच्या माध्यमातून साकारलेल्या समता इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावरील हा महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रथमच पाहायला मिळाला असल्याची प्रतिक्रिया उपस्थित पालकांनी व्यक्त केली.**

=====================================



# ग्रामीण भागात रोजगाराला चालना देण्याची गरज : डॉ. सुजय विखे

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**झरेकाठी :** शिर्डी मतदार संघाचे राजकारण हे सध्या पळत्या घोड्यासारखे वेगवान झाले आहे. राजकारण म्हणजे केवळ रस्ते बांधणे किंवा सामाजिक कार्यक्रमांना हजेरी लावणे इतपत मर्यादित न ठेवता, ते सर्वसमावेशक असावे. लोकांच्या हाताला शाश्वत रोजगार मिळवून देणे हीच खरी जबाबदारी आहे,'' अशी भूमिका माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडली. पत्रकार दिनाचे औचित्य साधून डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी त्यांनी आगामी काळातील विकासकामांचा आराखडा आणि राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. दूधेश्वर सफारी: पर्यटनासोबत रोजगाराची संधी

तालुक्यातील निमगांव जाळी येथील दूधेश्वर येथे ३५ कोटी खर्च करून 'सफारी' प्रकल्प उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती डॉ. विखे पाटील यांनी दिली. ते म्हणाले की, ''केवळ घोषणा करून उपयोग नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून बदल घडला पाहिजे. या एका प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील शेकडो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. जेव्हा लोक कामात गुंतलेले असतात, तेव्हाच समाजाची प्रगती होते. वेळातून विघातक प्रवृत्ती जन्म घेतात, त्यामुळे तरुणांना उद्योगाकडे वळवणे हे आमचे मुख्य ध्येय आहे.

या संवादातून डॉ. सुजय विखे पाटील यांनी आगामी काळात राहाता तालुक्यात केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर आर्थिक सुबत्ता आणणाऱ्या प्रकल्पांवर भर देण्याचे संकेत दिले आहेत. या कार्यक्रमाला तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित

## संजीवनी इंजिनिअरींगच्या २० विद्यार्थ्यांची ट्रेटा पॅक कंपनीत निवड

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या वीस विद्यार्थ्यांना ट्रेटा पॅक या बहुराष्ट्रीय कंपनीने आकर्षक वेतन देऊ करून नोकरीची संधी दिली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्द प्रयत्नाचे हे फलीत आहे. या विभागाच्या माध्यमातून दिल्या जाणा-या उद्योगाभिमुख प्रशिक्षणामुळे हे शक्य झाले. या विद्यार्थ्यांत बी.टेक. अंतिम वर्षातील मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या पंधरा, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या तिन आणि मेकॅट्रॉनिक्स दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

त्यांची नावे पुढील प्रमाणे, मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या सानिका प्रदिप भागवत, आकाश बापू दावभाट, वैष्णवी शीतल गिरी, साहिल अशोक गोरे, सत्यम दत्तात्रय जाधव, शताक्षी सुनिल कलसाईत, श्रुती राजेंद्र कोरके, साक्षी बाबासाहेब म्हस्के, ऋषिकेश विलास पानगव्हाणे, साक्षी नारायण पवार, आकांक्षा सुनिल वैराळ, श्रध्दा विजय भवर, कृष्णा ज्ञानेश्वर माळी, भाऊसाहेब तर्डे, हर्षल धोंडीबा गागरे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या कल्याणी दिलीप काकड, शिवानी राजु काकडे, चंचल संतोष जाधव व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या श्रध्दा विला औताडे आणि साक्षी साहेबराव जाधव. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यकारी विश्वस्त अमित यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## नगर मनमाड महामार्गावर ६८ वाहनांवर कारवाई, ५0 दंड वसूल

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**राहुरी :** अहिल्यानगर ते मनमाड जाणाऱ्या महामार्गाचे काम चालू असून राहुरी शहरांमध्ये एकेरी वाहतूक करण्यात आली आहे तरी सदर वाहतूक ही संथ गतीने चालू असते तरी गर्दीमध्ये रॉंग साईडने आपली वाहने घेऊन येऊन सदरची वाहतूक ही ठप्प केली जाते अशा वाहन चालकावर काल दिनांक ५ फेब्रुवारी रॉंग साईडने वाहने घालणाऱ्या व रंगीत काचा वाहनधारकावर ६८ वाहनावर कारवाई करून त्यांच्याकडून ५0१५0/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

त्यापैकी ब्लॅक काचा, रंगीत काचा वाहन चालक चे २५ वाहनावर कारवाई करून २२000 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

तरी याद्वरे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपण आपली वाहने लेनमध्ये ठेवावी कोणतीही वाहने रॉंग साईडने घालू नये जेणेकरून ट्राफिक जामच्या प्रश्नाला आपणास सामोरे जावे लागेल व त्यामुळे सामान्य नागरिकांना विनाकारण त्रास होतो व आपणास दंडात्मक कारवाई सामोरे जावे लागेल तसेच आपले वाहनाचे रंगीत व काळ्या काचा काढून घ्याव्यातअशी राहुरी पोलीस स्टेशन वाहतूक विभागाच्या वतीने सर्व नागरिकांना विनंती करण्यात आहे.

# निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज....

## २२४ गावात मतपेट्या घेऊन कर्मचारी रवाना

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**गंगापूर :** तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांनी मुद्दाम दांडी मारणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विजय राऊत सहायक निवडणूक अधिकारी नवनाथ वगवाड यांनी सांगितले. तालुक्यात उद्या (७ फेब्रुवारी) होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाची सर्व यंत्रणा सज्ज असल्याचेही त्यांनी नमूद केले. इनडोअर स्टेडियम, गंगापूर येथून २२४ गावांमध्ये मतपेट्या रवाना करण्यात आल्या. मतदान कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ४१ बस, ४९ क्रुझर तसेच खाजगी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.तालुक्यातील एकूण ३४७ मतदान सुमारे १७०० मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक केंद्रावर एक कक्ष अधिकारी, तीन मतदान अधिकारी व एक शिपाई तैनात राहतील. या



निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ९ गट आणि पंचायत समितीच्या १८ गणांसाठी २,९८,८९२ मतदार मतदान करतील. यांपैकी १,५५,७८० पुरुष, १,४३,०९८ महिला तर १४ 'इतर' मतदार आहेत. मतदान सकाळी ७.३० सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे.

निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी ३४७ मतदान यंत्रे वापरण्यात येणार असून, संभाव्य बिघाडांसाठी ७० अतिरिक्त यंत्रे राखीव ठेवली आहेत. तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी ३६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या फिरती पथकांची रचना करण्यात आली आहे. सुरक्षेसाठी पोलीस व होमगार्ड मिळून सुमारे ७०० कर्मचारी तैनात राहतील. मतमोजणी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

# दहा वर्षांचा 'खेलो इंडिया मिशन' : भारताला क्रीडाशक्ती बनविण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प...

केंद्र सरकारने क्रीडा क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी पुढील दहा वर्षांसाठी 'खेलो इंडिया मिशन' जाहीर केले असून, या मिशनमुळे भारताच्या क्रीडा क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडणार आहे. हा उपक्रम केवळ खेळाडूंपुरता मर्यादित नसून प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ, क्रीडा व्यवस्थापक, क्रीडा विज्ञान तज्ज्ञ, उद्योजक आणि युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करणारा ठरणार आहे. खेळ म्हणजे फक्त किंवा मनोरंजन नसून तो रोजगार, आत्मनिर्भरता आणि राष्ट्रनिर्मितीचा प्रभावी आधार आहे, हीच या मिशनची मूलभूत भूमिका आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात खेलो इंडिया मिशनसाठी भरीव तरतूद जाहीर केली आहे. युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या एकूण बजेटमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ११३३ कोटी रुपयांची वाढ करण्यात असून, यामुळे क्रीडा पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि खेळाडू विकास कार्यक्रमांना मोठे बळ मिळणार आहे. सरकारने क्रीडा क्षेत्राला प्राधान्य देत हजारो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या मिशनअंतर्गत देशभरातील शाळा, महाविद्यालये, ग्रामीण व शहरी भागांतून नवोदित खेळाडूंचा शोध घेणे, त्यांना आधुनिक प्रशिक्षण, दर्जेदार क्रीडा सुविधा, निवासी प्रशिक्षण वैज्ञानिक पद्धतीने सराव आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शन देण्यावर भर दिला जाणार आहे. प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, क्रीडा विज्ञान, पोषण, फिटनेस आणि मानसिक आरोग्य यांचाही समावेश या योजनेत करण्यात आला आहे.

गावोगाव ऑलिम्पिक खेळाडू घडवणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असून, लहान गावे, आदिवासी व दुर्गम भागातील गुणवान खेळाडूनाही राष्ट्रीय व व्यासपीठ मिळणार आहे. यामुळे शहरी भागापुरते मर्यादित असलेले क्रीडा संधीचे चित्र बदलण्याची शक्यता आहे.

भारत २०३० आणि २०३६ ऑलिम्पिक स्पर्धांच्या आयोजनाच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्या पार्श्वभूमीवर खेलो इंडिया मिशन अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा मैदाने, प्रशिक्षण केंद्रे, स्पोर्ट्स अकॅडमी, क्रीडा विद्यापीठे आणि संशोधन केंद्रे उभारण्यावर सरकारचा राहणार आहे. यामुळे भारत जागतिक क्रीडा नकाशावर प्रभावीपणे आपली ओळख निर्माण करू शकेल.याशिवाय 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत क्रीडा साहित्याचे देशांतर्गत उत्पादन वाढवले जाणार आहे. फुटबॉल, क्रिकेट, हॉकी, कबड्डी, व्हॉलीबॉल, अॅथलेटिक्ससह विविध खेळांसाठी लागणारे साहित्य भारतातच तयार केले जाईल. यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक उद्योगांना चालना मिळणार असून, मोठ्या रोजगारनिर्मिती होणार आहे.

एकूणच, खेलो इंडिया मिशन हे केवळ क्रीडा प्रोत्साहनाचे अभियान नसून, युवक सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती, आत्मनिर्भर भारत आणि भारताला जागतिक क्रीडाशक्ती बनविण्याचा दीर्घकालीन आराखडा आहे. पुढील दहा वर्षांत भारतीय क्रीडाक्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद या मिशनमध्ये निश्चितच आहे.

**गौरव डेंगळे**

**( श्रीरामपूर ८७९३३२१५१५)**


## जाहीर फेर निविदा सूचना प्रथम

### कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव, जिल्हा अहिल्यानगर

KOPARGAON MUNICIPAL COUNCIL,
(Dist. Ahilyanagar) Pin-423601

जा.क्र. मार्केट/वशि/८/२६५७ दिनांक : / /२०२६

कोपरगाव नगरपरिषद मार्केट विभागामार्फत सन २०२६ करीता महाशिवरात्री निमित्त सी.स.नं १८७४ बाजारतळ येथे विविध प्रकारचे स्टॉल, खेळणी, पाळणे, मनोरंजन साहित्य, कटलरी साहित्य लावणेकरीता तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देणेकामी खालीलप्रमाणे जाहीर फेर निविदा द्वि लिफाफा पद्धतीने मागविणेत येत आहे. निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि.०९/०२/२०२६ते दि.०९/०२/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत चालू राहील, भरलेली निविदा फॉर्म दि. ०९/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | तपशील | किमान देकार रक्कम | निविदा अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | कोपरगाव नगरपरिषद, हद्दीमध्ये सालाबादप्रमाणे सन २०२६ मध्ये महाशिवरात्री निमित्त विविध प्रकारचे स्टॉल, खेळणी, पाळणे, मनोरंजन साहित्य कटलरी साहित्य ई करीता सि.स.नं १८७४ बाजारतळ परिसरात तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देणे | १५,४०,०००/- | ५०,०००/- | १,०००/- नापरतावा |

**अटी व शर्ती**

१) सदर निविदेच्या अटी व शर्ती कोपरगाव नगरपरिषदेच्या मार्केट विभागाकडे पहावयास मिळतील तसेच निविदा फॉर्म सोबत देण्यात येत्तील.
२) किमान देकार रकमेपेक्षा कमी रकमेची निविदा स्वीकारण्यात येणार नाही.
३) मंजूर निविदा रकमेवर १८% ऋद्धढ रक्कम भरावी लागेल.
४) सदर निविदा स्वीकारणे अथवा नाकारनेचा अधिकार नगरपरिषदेणे राखून ठेवला आहे.

निविदा फॉर्मसोबत करारनाम्याच्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कोपरगाव नगरपरिषद मुख्याधिकारी साहेब यांनी राखून ठेवला आहे.

स्वा./XXX
मुख्याधिकारी
कोपरगाव नगरपरिषद कोपरगाव


## निधन वार्ता

### माधव जंगले



**पानेगांव :** नेवासे पानेगांव येथील प्रगतीशिल शेतकरी माधव भागवत जंगले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले (वय ६८) त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ तीन मुले, पुतणे, सुना, जावई, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. पानेगांव संस्थेचे माजी अध्यक्ष शिवाजीराव जंगले यांचे बंधू, सामाजिक कार्यकर्ते संभाजी, विलास, व दिपक जंगले यांचे वडिल होत.

### धर्मा जावळे



**कोपरगाव** कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथील रहिवाशी धर्मा भाऊ जावळे वय ९0 वर्ष यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पक्षात एक भाऊ,चार मुले, एक मुलगी, पुतणे सुना नातवंडे असा परिवार आहे.ते शांतीलाल जावळे, शामराव जावळे, सुधाकर जावळे व कोपरगाव तालुका शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख सिताराम जावळे यांचे वडील होते.


## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि. ०७ फेब्रुवारी २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ६७० ५८० ३-६ २४० २६८ ३३०
जोड ३२-४६-१९ ९८-६0

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१५६ २४६ ६६0 २-५ १४0 २३0 ७८0
जोड २९-८५-४१ ३७-५0

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१५0 २४0 ३३0 ६-२ १२९ ४८0 २२८
जोड ६८-४२-३१ 0७-२९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 29/09/2025 to 03/10/2025 | 267 57 278 | 459 83 490 | 899 62 246 | 244 05 456 | 779 39 126 |
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | |

# महापौर व उपमहापौर पदभार स्विकारताच आरोग्य विभागाची बैठक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नव्याने निवडून आलेल्या महापौर ज्योतीताई गाडे आणि उपमहापौर ड.धनंजय जाधव यांनी बिनविरोध निवडीनंतर पहिल्याच दिवशी महानगरपालिका आरोग्य विभागाची समीक्षा बैठक घेत शहरातील आरोग्य व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत दोन्ही पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजांना प्राधान्य देत ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.



उपमहापौर ड.धनंजय जाधव यांनी सांगितले की, आरोग्य हा विषय शहराच्या प्रगतीसाठी सर्वात महत्त्वाचा आहे. नगरकरांचे आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहावे यासाठी महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करेल. शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवण्याचे काम महापालिकेच्या माध्यमातून केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, साथीचे आजार पसरणार नाहीत यासाठी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षणावर विशेष भर देण्यात येईल. स्वच्छ, सुंदर आणि हरित शहरासाठी महापालिका म्हणून आम्ही कमी पडणार नाही. प्रत्येक कामामध्ये नगरकरांचा सक्रिय सहभाग राहील, असे ड.जाधव यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान आरोग्य विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी शहरातील आरोग्य सेवा केंद्रांची माहिती विचारली असता डॉक्टरांनी सांगितले की, अहिल्यानगर शहरात सात प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्याअंतर्गत १८ उपकेंद्रांच्या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. त्याचबरोबर दोन 'आपले दवाखाने' व एक क्षयरोग नियंत्रण केंद्रही कार्यरत आहे. या सर्व केंद्रांच्या कामकाजाची स्थिती, उपलब्ध कर्मचारी, औषध साठा व नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहितीही उपमहापौरांनी घेतली.

त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले की, डॉक्टर, नर्स, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अडचणी लेखी स्वरूपात द्याव्यात; त्या तातडीने सोडविल्या जातील. मात्र, कामचुकारपणा सहन केला जाणार नाही आणि जबाबदारी टाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. या बैठकीस अमोल गाडे, नगरसेवक करण कराळे, सुजित मोहिते, वर्षा सानप, आयुषमान भारतचे जिल्हा समन्वयक अमित धाडगे,सतीश शिंदे, रोहन सानप, अभिषेक वाकळे, डॉ. दिलीप बागल, तसेच आरोग्य विभागातील डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# परिक्रमा ग्रुप ऑफ इन्स्टीट्युशन्सचा 'उडान २०२६'उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : परिक्रमा ग्रुप ऑफ इन्स्टीट्युशन्स, काष्टी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन 'उडान २०२६' हा भव्य सोहळा विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने, जल्लोषात आणि शिस्तबद्ध नियोजनात पार पडला. शैक्षणिक गुणवत्ता, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ देणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला–थोडक्यात सांगायचं तर टॅलेंट ऑन डेक, एनर्जी ऑन फुल! शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेल्या परिक्रमा ग्रुपच्या 'उडान' स्नेहसंमेलनाबाबत नेहमीच उत्सुकता असते. यंदाचा 'उडान २०२६' हा उपक्रम २७ जानेवारी २०२६ ते ०४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीपणे पार पडला. या काळात क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो–खो, ॲथलेटिक्स, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.यासोबतच ट्रॅडिशनल डे, बॉलीवूड व रेट्रो डे, ट्विन्स डे अशा थीम–डेजनी कॅम्पस रंगला. रांगोळी, मेहंदी, रील्स स्पर्धांतून विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता सादर केली. 'आनंदनगरी' उपक्रमांतर्गत खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारून विद्यार्थ्यांनी उद्योजकतेचे प्राथमिक धडे प्रत्यक्ष अनुभवातून घेतलेबुक्स ऑन टेबल, बिझनेस इन ॲक्शन! कार्यक्रमाची सुरुवात परिक्रमा ग्रुप ऑफ इन्स्टीट्युशन्सचे संस्थापक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते झाली. यावेळी आ. विक्रमसिंह बबनराव पाचपुते प्रमुख उपस्थितीत होते. संस्थेच्या अध्यक्षा, व्यवस्थापन मंडळ सदस्य, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, संगीत, नाट्यप्रयोग, गायन आणि फॅशन शो यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणातून आत्मविश्वास, मेहनत आणि सर्जनशीलतेचा ठसा उमटला. कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील अभिमान पाहण्यासारखा होता. 'उडान २०२६' ने विद्यार्थ्यांना नव्या उंचीवर झेप घेण्यासाठी ऊर्जा दिली असून, परिक्रमा ग्रुप ऑफ इन्स्टीट्युशन्सच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेला अधिक बळ मिळाले आहे. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## द•ख•ल

### एमआयडीसीतील वृक्षतोड प्रकरणी गुन्हे दाखल करा; मागणी

**अहिल्यानगर** : शहरातील औद्योगिक क्षेत्र असलेल्या एमआयडीसी परिसरात एल ॲण्ड टी कंपनीजवळ मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना (एकनाथ शिंदे) सामाजिक न्याय विभागाने केला आहे. या प्रकरणी संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी व उपवनसंरक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. एल ॲण्ड टी कंपनीच्या गेट क्रमांक ३ समोरील मुख्य रस्त्यालगत शेकडो झाडांची कोणतीही वनविभागाची पूर्वपरवानगी न घेता कत्तल करण्यात आल्याचा आरोप आहे. बेकायदेशीर पार्किंगसाठी झाडांची थेट खोडापर्यंत तोड केल्याचे निदर्शनास आले असून, हे पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. एमआयडीसी कार्यालयाच्या जवळच ही घटना घडूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांनी दिला आहे.

### विविध विकासकामांची गटविकास अधिकारी सोनल शहा यांची पाहणी

**शेवगाव** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत शेवगाव तालुक्यातील दहीगाव शे (ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांची गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी, घरकुल योजना, स्वच्छतागृह तसेच स्वच्छता अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. अभियानांतर्गत वनराई बंधारा, कोल्हापूर पद्धतीचा बंधारा तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचीही तपासणी करण्यात आली. कामांच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करत काही ठिकाणी आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शक सूचना दिल्या. या पाहणी दौऱ्यावेळी सरपंच रामेश्वर भापकर, नोडल अधिकारी सचिन भाकरे, ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत बरबडे, उपसरपंच मंदा खरात यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य विभागातील अधिकारी, आरोग्य सेविका, आशा व अंगणवाडी सेविका तसेच माजी सरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून दहीगाव शेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून प्रशासन व ग्रामस्थांच्या समन्वयातून विकासकामे वेगाने सुरू असल्याचे यावेळी दिसून आले. अधिकारी व ग्रामस्थांनी भविष्यातील विकासासाठी सकारात्मक अपेक्षा व्यक्त केल्या.

### माजी चेअरमन किसन कवाद यांच्या स्मरणार्थ येवले शाळेला देणगी



**निघोज** : निघोज सोसायटीचे माजी चेअरमन किसनराव कवाद यांच्या पुण्यस्मरण निमित्ताने कवाद कुटुंब व त्यांच्या नातेवाईकांनी बाभुळवाडे येथील जाईबाई येवले आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन दिले तसेच जवळपास ६ हजार रुपये देणगी दिली. कवाद बंधू व त्यांच्या नातेवाईकांनी केलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून अशाप्रकारे सामाजिक उपक्रम राबवून त्याचा फायदा सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबाजी येवले यांनी व्यक्त केले आहे. यावेळी कै. कवाद यांचे चिरंजीव डॉ. शंकर कवाद, अविनाश कवाद, सुनंदा विजय जरारे व परिवार उपस्थित होता. पुण्यस्मरण निमित्ताने अर्जुन रखमा कवाद यांनी संस्थेला १ हजार एक रुपये, दादासाहेब तुकाराम सालके यांनी ५ हजार रुपये देणगी दिली आहे.

### शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपीस जामीन

**शेवगाव** : शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक प्रकरणात अटकेत असलेला 'एस. आर. इन्वेस्टर' या नावाने ट्रेडिंग व्यवसाय चालवणारा कुरुडगाव (ता. शेवगाव) येथील शंकर रावसाहेब शिंदे याचा नियमित जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने नामंजूर केला आहे. बुधवार, दि. ४ रोजी न्यायाधीश के. एस. कुलकर्णी यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत हा निर्णय देण्यात आला. या प्रकरणी शेवगाव येथील पीडित अवधूत विनायक केदार यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आरोपीने 'एस. आर. इन्वेस्टर' नावाची शेअर ट्रेडिंग कंपनी असल्याचे भासवून १२ टक्के परताव्याचे आमिष दाखवत फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांकडून सुमारे २ कोटी ८९ लाख रुपयांची गुंतवणूक घेतल्याचा आरोप आहे. मात्र ना परतावा देण्यात आला, ना मूळ रक्कम परत करण्यात आली. या प्रकरणात आरोपीविरुद्ध भादंवि कलम ४२०, ४०६, ४०९, २०१ तसेच एमपीआयडी कायद्यान्वये गुन्हा दाखल आहे. जामीन अर्जास पीडित पक्षाने ड. पंकज पद्माकर खराडे यांच्यामार्फत तीव्र विरोध केला. गुन्ह्याचे गांभीर्य, पुरावे आणि साक्षीदारांवर दबाव येण्याची शक्यता लक्षात घेता जामीन देणे योग्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

# पदोन्नतीसाठी टीईटी सक्ती रद्द करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : शिक्षक संवर्गातून पदोन्नती देताना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सक्तीची अट तातडीने रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आल्याची माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने २०१० मध्ये केलेल्या अंमलबजावणी कायद्यात पदोन्नतीसाठी टीईटी आवश्यक असल्याची कोणतीही तरतूद नाही. असे असतानाही शालेय शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी १९ जानेवारी २०२६ रोजी काढलेल्या आदेशात पदवीधर शिक्षक, उच्च प्राथमिक केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी तसेच प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापक पदासाठी टीईटी अनिवार्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा आदेश कायदे, शासन निर्णय व वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचा आरोप शिक्षक भारतीने केला आहे. १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने अद्याप कोणताही स्पष्ट धोरणात्मक निर्णय घेतलेला नसताना असा आदेश काढण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात विविध राज्यांत तसेच महाराष्ट्रातील शिक्षक संघटनांनी पुनर्विचार याचिका दाखल केल्या असून त्या अद्याप प्रलंबित आहेत. अंतिम निर्णय होईपर्यंत तसेच केंद्र सरकारकडून स्पष्ट मार्गदर्शक सूचना येईपर्यंत पदोन्नती, वरिष्ठ व निवडश्रेणी, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक पदांसाठी टीईटीची अट लागू करणे अयोग्य असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शिक्षण अधिकाऱ्यांकडून घाईघाईने आदेश काढून पदोन्नती प्रक्रिया थांबवली जात असल्याने शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे अवर सचिवांनी काढलेला टीईटी सक्तीचा आदेश तातडीने रद्द करावा, अशी मागणी शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# पोलीस, सीआरपीएफ आणि रॅपीड ॲक्शन फोर्सचे संचलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : शहरात स्थानिक पोलीस यांच्यासह सीआरपीएफ आणि रॅपीड एक्शन फोर्स यांचे संयुक्त पथसंचलन शुक्रवारी सकाळी पार पडले. कर्जत पोलीस स्थानकातून निघालेला रूट मार्च रथमार्गावरून बसस्थानक परिसरात नेण्यात आला. पोलीस वाहनांच्या सायरन शहर दणाणून सोडले होते. पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एसीपी विशाल बिन्नर आणि पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोऱ्हाडे यात सहभागी झाले होते.




कर्जत शहरातील संवेदनशील ठिकाणी यासह शहराची भौगोलिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी सीआरपीएफ आणि रॅपीड एक्शन फोर्सचे एसीपी विशाल बिन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली दोन सहकारी अधिकारी यासह ३७ जवानांसोबत पथसंचलन पार पडले. शुक्रवारी सकाळी १० वाजता कर्जत पोलीस ठाण्याच्या आवारात सदरच्या पथसंचलनास सुरुवात झाली. हा रूटमार्च दादा पाटील महाविद्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, महात्मा ज्योतिबा फुले चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, म्हसोबा गेट, कापरेवाडी वेस, आलमगीर मज्जिद, काकडे हॉस्पिटल, बाजारतळ, मेन रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानकातून नेण्यात आला.

कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी गृहविभागासह पोलीस प्रशासन सतर्क असून सर्वसामान्य नागरिकांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेचे पालन करावे. कोणी कायदा–सुव्यवस्था हातात घेणार नाही याबाबत आवाहन करण्यात आले. अचानक पोलीस वाहनांचे सायरन वाजवत निघालेल्या रूटमार्चने नागरिक अवाक झाले होते.

# स्व. अजितदादा पवार यांना शेवगावात सर्वपक्षीय शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर** : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाबद्दल शेवगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता सर्वपक्षीय शोकसभा पार पडली. या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. नरेंद्र घुले पाटील म्हणाले की, समाजातील सर्व घटकांच्या प्रश्नांची सखोल जाण, प्रशासनावर प्रभावी वचक आणि विकासाचे स्पष्ट व्हिजन असलेले नेतृत्व आपण गमावले आहे.

जनतेने दिलेल्या सत्तेचा उपयोग स्व. अजितदादा पवार यांनी नेहमीच लोककल्याणासाठी केला. असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. घुले पुढे म्हणाले की, लोकनेते मारुतराव घुले पाटील यांचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. त्या माध्यमातून अजितदादा पवार यांनी शेवगाव, नेवासा व पाथर्डी तालुक्यांसह संपूर्ण जिल्ह्यातील विविध विकासकामांना मोलाचे सहकार्य केले. ताजनापूर उपसा जलसिंचन प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक एक व दोनसाठी भरीव निधी, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दहिगाव शाखेच्या संगणकीकरणाच्या शुभारंभासाठी प्रत्यक्ष उपस्थिती ही त्यांच्या विकासदृष्टीची उदाहरणे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी आ. मोनिका राजळे म्हणाल्या की, अजितदादा यांच्या शब्दकोशात 'नाही' हा शब्दच नव्हता. मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी त्यांनी नेहमी सकारात्मक सहकार्य केले. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबातील सदस्य हरपल्याची भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली असे त्या म्हणाल्या. या शोकसभेस अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले, पंचायत समितीचे माजी सभापती अरुण लांडे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ड. सुभाष पाटील, शिंदे सेनेचे अरुण मुंडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तालुकाध्यक्ष ड. अविनाश मगरे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. अमोल फडके, ज्येष्ठ नेते काकासाहेब नरवडे, तसेच अशोक आहूजा, एजाज, आशुतोष डहाळे, साईनाथ आघाट, वजीर पठाण, संजय फडके, राम शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय नगरसेवक सुनील काकडे, डॉ. नीरज लांडे, अभय देशपांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नानासाहेब मडके, तसेच मार्केट कमेटीचे अकौन्ट मुद्दर शेख ,माजी सभापती डॉ. अनिल मडके, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, विष्णू कोठुळे, अनिल भुसारी, पदाधिकारी, व्यापारी, हमाल, मापाडी, डॉक्टर, वकील व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शोकसभेचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे यांनी केले. शेवटी दोन मिनिटांचे मौन पाळून स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# कर्जतमध्ये १० दिवसीय तमाशा प्रशिक्षण शिबीराचे उद्धाटन

## लोककला जिवंत ठेवण्यासाठी शासनाकडून प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : तमाशासारखी पारंपारिक लोककला जपणं आणि ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तमाशा प्रशिक्षण शिबिर घेणे ही काळाची गरज आहे. अशाच प्रशिक्षण शिबिरातूनच नवीन कलावंत घडतील असे प्रतिपादन कर्जतच्या नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी केले.



ते कर्जत येथे तमाशा प्रशिक्षण शिबीर उदघाटन प्रसंगी बोलत होते. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने कर्जत येथे १० दिवसीय तमाशा प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दिवंगत तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांचे नातू डॉ. मोहित सावंत यांच्या अध्यक्षतेखाली उदघाटन संपन्न झाले.

यावेळी बोलताना रोहिणी घुले म्हणाल्या की, अलीकडच्या काळातील चित्रपट, टीव्ही, मोबाईल, सोशल मीडिया सारख्या विविध माध्यमांच्या भाऊ गर्दीत आपली पारंपारिक तमाशा ही कला हरवून जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र ग्रामीण भागात आजही ग्रामदैवतांच्या जत्रा, यात्रा मधून महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून आलेल्या तमाशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच शासनाच्या माध्यमातून देखील दरवर्षी तमाशा महोत्सव, तमाशा प्रशिक्षण शिबिरे आयोजित केले जातात. त्यामुळे ही कला नष्ट होणार नसून जीवंत राहणार आहे.

दिवंगत शाहीर पठ्ठे बापूराव, दिवंगत तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करीत नटराज पूजन व दीप प्रज्वलन करून या शिबिरास प्रारंभ करण्यात आला. उद्धाटन समारंभास मारुती सूर्यवंशी, शब्बीरभाई पठाण, संतोष पवार, शुभम जाधव, बाबा चंदन, अरविंद जाधव, बाबा राजगुरू यांच्यासह प्रा. स्वप्निल मस्के व दादा पाटील महाविद्यालय, वसंतराव नाईक महाविद्यालय, व शंकरराव पाटील महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

शिबिर संचालक हसन शेख पाटेवाडीकर यांनी प्रास्ताविक केले. भगवान राऊत यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत शिंदे कापरेवाडीकर यांनी आभार मानले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरिता संपूर्ण यंत्रणा सज्ज-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

## निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार लोकशाहीचा पवित्र उत्सव साजरा करताना मतदान अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्ये जबाबदारीने बजाविण्याबाबत सूचना दिल्या आहेत; पात्र मतदारांनी निवडणुकीकरिता उत्स्फूर्तपणे मतदान करावे, नागरिक व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसहिंतेचे पालन करून शांततेत पूर्ण प्रक्रिया पार पाडावी, निवडणुकीच्या कामकाजाकरिता संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी पत्रकार परिषदेत शुक्रवारी (ता. ६) केले आहे. जिल्हा परिषदेच्या ७३ गट व पंचायत समितीच्या १४६ गणाकरिता शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० असून मतदानापुर्वी पोल घेतला जाणार आहे. मतदानाच्या दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारी रोजी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे किंवा समाज माध्यमांमध्ये कुठल्याच प्रकारच्या जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत.

मतदानाकरिता सार्वजनिक सुट्टीमतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यक्षेत्रात ३ फेब्रुवारीच्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेद्वरे शनिवार, फेब्रुवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी मतदार संघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना सुद्धा लागू राहील. केंद्र शासनाच्या शासकीय, निम्न शासकीय कार्यालय, सार्वजनिक उपक्रम बँका आदींना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील. येत्या ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता जिल्ह्यातील अधिकाधिक मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केले आहे.



जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र तसेच हवेली, भोर आणि इंदापूर तालुक्यात प्रत्येकी १ याप्रमाणे ३ परदानशीन मतदान केंद्र आहेत. मतदान प्रक्रियेकरिता १४ हजार ३१८ बॅलेट युनिट, ५ हजार ८१३ कंट्रोल युनिट यंत्र, मेमरी चीप ३ हजार बॅटरी ३ हजार ९९१ वितरित करण्यात आले आहेत. जिल्ह्यात २९ लाखाहून अधिक मतदार बजावणार मतदानाचा हक्कजिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ करिता जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून याअंतर्गत पुरुष १५ लाख २७ हजार १५१, स्त्री १४ लाख ४९ हजार ५६० आणि इतर ९४ असे एकूण लाख ७६ हजार ८०५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे निवडणूक कामकाजाकरिता २३ हजाराहून अधिक कर्मचारी कार्यरत सर्व मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आदी अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून संपूर्ण निवडणूक कामकाजाकरिता एकूण २३ हजार ११४ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता पर्याप्त पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलींग पार्टी सर्व साहित्यासहित आपआपल्या मतदान केंद्रावर पोहोचल्या असून मतदान प्रक्रियेसाठी सुसज्ज आहेत. निवडणूकीच्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहेत. मतदान जनजागृती अभियानाअंतर्गत मतदानाची टक्केवारीत वाढ होण्याकरिता विविध प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले आहे. निवडणूकीकरिता ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानाची ९ रोजी मतमोजणी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येणार आहे. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांतता, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.डुडी यांनी केले आहे.

दखल

## शिक्रापुरात कंपनीतील पितळी पार्ट चोरी



**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील सुचेत अग्रो एलएलपी प्लास्टिक फिल्टर टँक बनवले जात असून सदर कंपनीमध्ये फिल्टर टँक साठी वापरले जाणारे पितळी धातूचे काही पार्ट आणून मशीन जवळ ठेवलेले असतात, नेहमीप्रमाणे सकाळच्या सुमारास कामगार मशीन जवळ काम करत असताना त्यांना मशीन जवळ ठेवलेले पितळी धातूचे पार्ट नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी कंपनी व्यवस्थापक यांना माहिती दिल्याने कंपनी व्यवस्थापकांनी ठिकाणी जाऊन पाहणी करत कंपनीतील सीसीटीव्ही तपासले असता रात्रीच्या सुमारास एका अज्ञात इसमाने कंपनीतील पितळी धातूचे तब्बल एक लाख तीस हजार रुपये किमतीचे एक हजार साठ पार्ट चोरी केल्याचे दिसून आले, याबाबत चेतन डायाभाई बोरा (वय ४६ वर्षे रा.डेक्कन गोल्ड सोसायटी खराडी पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद पोलिसांनी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे हे करत आहे.

## पारोडीत दुचाकीहून घसरुन पडल्याने युवकाचा मृत्यू



**तळेगाव ढमढेरे :** पारोडी (ता. शिरुर) येथील तळेगाव न्हावरा रस्त्यावर भरधाव दुचाकी घसरुन पडल्याने युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून संतोष संपत गवारी असे सदर मृत युवकाचे आहे. पारोडी (ता. शिरुर) येथील तळेगाव न्हावरा रस्त्याने संतोष गवारी हा त्याच्या ताब्यातील एम एच १२ एफ जे ७१९१ या दुचाकीहून चाललेला असताना संतोषचे दुचाकीवरील नियंत्रण सुटून संतोष दुचाकीसह रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाला, त्याला उपचारासाठी शिक्रापूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले मात्र उपचार सुरु असताना संतोष संपत गवारी ३४ वर्षे रा. विठ्ठलवाडी ता. शिरुर जि. पुणे) याचा मृत्यू झाला असल्याने याबाबत सागर रामदास सुपेकर (वय ३७ वर्षे रा. कुरुळी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस हवालदार अमोल चव्हाण हे करत आहे.

## इंद्रायणीत अजित अस्थींचे हरिनामाच्या गजरात विसर्जन

**आळंदी :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन पवित्र इंद्रायणी नदीत अत्यंत भावपूर्ण वातावरणात करण्यात आले. आळंदीकरांनी अश्रूंनी निरोप देत दादांना श्रद्धांजली वाहिली. वडगाव चौकात अस्थिकलश रथ हरिनाम, टाळ-मृदंगाच्या गजरात वारकरी साधकांसह शहरात दाखल झाला. प्रदक्षिणा रस्ता मार्गे भैरवनाथ चौक, चावडी चौकातून माऊलींच्या मंदिरासमोर महाद्वार चौकात दर्शनासाठी ठेवण्यात आला. यावेळी



मोठ्या संख्येने वारकरी, भाविक, ग्रामस्थ व नागरिकांनी अस्थींचे दर्शन घेतले. इंद्रायणी घाटावर अस्थिकलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर इंद्रायणीच्या पवित्र डोहात अस्थिविसर्जन करण्यात आले. संपूर्ण विधी दरम्यान वातावरण शोकाकुल होते.

यावेळी माजी आमदार विलास लांडे, आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष कुऱ्हाडे, आळंदी देवस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम पाटील, माजी सभापती डी.डी.भोसले पाटील, श्रीधर कुऱ्हाडे, नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे, भाजप राज्य परिषद सदस्य राम गावडे, भाजप गटनेते सचिन गिलबिले, नगरसेवक दिनेश घुले, सागर कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, काँग्रेस शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील, कालिदास तापकीर, बाबासाहेब ठाकूर, चेअरमन अनिकेत कुऱ्हाडे, पुणे भाजपचे सचिव किरण येळवंडे, नगरसेवक पांडुरंग वहिले, भाऊसाहेब कोळेकर, आशिष गोगावले, संदेश तापकीर, सौरभ गव्हाणे, निसार सय्यद, संकेत वाघमारे, राहूल घोलप, पुष्पाताई कुऱ्हाडे, रूपालीताई पानसरे आदी उपस्थित होते.

## फुले पुणे विद्यापीठचे मोफत यूपीएससी- एमपीएससी प्रशिक्षण

### प्रशिक्षण प्रवेश परीक्षेची तारीख जाहीर

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील स्पर्धा परीक्षा केंद्र (उएउ) यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या मोफत UPSC MPSC प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली आहे. ही प्रवेश परीक्षा रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात येणार असून परीक्षा फक्त शहरात आयोजित करण्यात येणार आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठ अनुदान आयोग (णऋड) अंतर्गत राबविण्यात येत असून गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन मिळणार आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी आपले प्रवेशपत्र (हॉल तिकीट) दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाउनलोड करावे.

संकेतस्थळ : http://campus.unipune.ac.in/ccep/login.aspx परीक्षेचे ठिकाण व वेळ संपूर्ण माहिती प्रवेशपत्रावर नमूद करण्यात येणार आहे. पुणे शहराबाहेरील उमेदवारांनी वाहतूक व इतर अडचणी लक्षात घेता परीक्षेच्या एक दिवस आधी पुण्यात येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेशपत्र डाउनलोड करताना कोणतीही अडचण आल्यास उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत cspsuppo tpun.unipune.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. योजना विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी ठरणार असून, ग्रामीण व वंचित घटकातील तरुणांना णझडउ व चझडउ परीक्षांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन मिळणार आहे.

## दिवे परिसरात कांदा काढणी सुरु

**दिवे :** दिवे परिसरात तसेच पुरंदर तालुक्यात कांद्याचे पूर्वी पासूनच मोठ्या दर्जेदार उत्पादन घेतले जाते फुरसुंगी वाण या नावाने एकेकाळी बाजारात आपला मोठा दबदबा निर्माण केला होता तालुक्यात वीर, परिंचे, कोडित, भिवडि, बोपगाव, मावडि, दिवे वनपुरि आदि भागात शेतकरी चार पैसे हमखास हातात पडतील या आशेवर मोठ्या प्रमाणात कांदा लागवड करतात परंतु अलिकडच्या काळात बाजारभावातील अनिश्चितता उत्पादन खर्चात झालेली प्रचंड यामुळे कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे कांदा पिकाला एकरि साधारण साठ ते सत्तर हजार रूपये खर्च येतो आणि त्या तुलनेत सध्या मिळणारा बाजारभाव कमी आहे सध्या किलोलख अवघा तेरा ते चौदा रूपये बाजार मिळत आहे निसर्गाचा लहरिपणा आणी सततचे ढगाळ वातावरण यामुळे उत्पादन खर्चात मोठि वाढ झाली आहे गेले आठ महिन्यांपासून बाजारभावात अपेक्षित वाढ होत नसल्याने जुना कांदा अद्यापहि बाजारात विक्रीसाठी येत आहे आणि नवीन कांद्याची देखील आवक होत असल्याने बाजारभावात सुधारणा होत नाही हि वस्तुस्थिती आहे.........

यांत्रीक पद्धतीने कांदा लागवड केल्यास लागवड खर्चात देखील बचत होते शिवाय दोन रोपातील अंतर समान असल्याने कांद्याचे आकारमान एकसारखे शिवाय रोगराई देखील कमी होते व उत्पादनात वाढ होते तालुक्यातील कोडित व दिवे परिसरात यांत्रीक पद्धतीने कांदा लागवड केली होती त्याठिकाणी उत्पादन वाढले आहे......

## श्री क्षेत्र वीर येथे मानकरी तात्या बुरुंगुले यांनी वर्तवली भाकणुक

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**माळशिरस, पुरंदर:** मृगाचे पाणी तीन खंडात पडेल, चौथ्या खंडात आले गेले राहील, आश्लेषा मघा दोन खंडात पडतील उत्तरा , पूर्वा चार खंडात पडेल, हत्तीचं पाणी खंडात पडेल, मनुष्याच्या मागे साधारण आटापिटा राहील , गाई गुरे, शेळ्या मेंढ्या यांची रोगराई हटणार आहे ''अशी भाकणूक (भविष्यवाणी) झाली अन् नाथ साहेबांचं चांगभलं, सवाई सर्जाचं चांगभलं च्या जयघोषात क्षेत्र वीरचा परिसर पुन्हा एकदा भक्तिरसात न्हाऊन निघाला श्री क्षेत्र वीर येथे सध्या श्री नाथ म्हस्कोबा व देवी जोगेश्वरी यांचा दिवसीय यात्रा महोत्सव सुरू असुन आज माघ वद्य पंचमीच्या मुहूर्तावर देऊळवाड्यात पारंपरिक भाकणुकीचा कार्यक्रम पार पडला आणि ही भाकणूक सांगत होते देवाचे मानकरी तात्या बुरुंगुले... आज पासूनच गजे भोजनालाही प्रारंभ झाला आहे. मुख्य कार्यक्रमानंतर सर्व मानाच्या



पालख्या व काठ्या यांच्या दोन मंदिर प्रदक्षिणा होऊन त्या आपल्या आपल्या तळावर विसावल्या. आज शुक्रवार माघ वद्य पंचमीला पहाटे ४ वाजता श्रीनाथ म्हस्कोबा व देवी जोगेश्वरी यांची अभिषेक पुजा अर्चा व देवांचा पोशाख करण्यात आला. सकाळीं अकरा वाजता मंदीर बंद करून पुन्हा साडे अकरा वाजता दर्शनाला खुले करण्यात आले. दुपारी १.३० वाजता सर्व मानाच्या काठ्या देऊळ वाड्यात दाखल झाल्या आरती होउन छबीन्याला झाली या प्रसंगी वाई कण्हेरी ,राजेवाडी भोंडवेवाडी, सोनावडी, वीर व कोडीत, कसबा या मानाच्या पालख्या देऊळ वाड्यात आल्या ढोल ताशांच्या गजरात एक मंदिर प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर दुपारी दोन वाजता मानकरी तात्या बुरूगुले यांच्या अंगात देव संचारला व पारंपरिक भाकणुकीला सुरवात केली यावेळी मंदीर परीसरात शांतता होती. यात्रेच्या निमित्ताने मंदिर परिसरात दर्शन बारी,, स्वच्छता, पार्किंग , पुरेशा पोलिस बंदोबस्त आदी बाबी सुरळीत पार पडत असल्याचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मोहन धुमाळ यांनी सांगितले.

## जुने वैर, महिलेवर रक्तरंजित हल्ला

### फरार आरोपीला अखेर बारामती तालुका पोलिसांकडून अटक..!

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**बारामती :** जुन्या भांडणाच्या कारणावरून सोनगाव (ता.बारामती) येथे एका जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने घरात घुसून धारदार चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना (दि.२२) डिसेंबर २०२५ रोजी घडली होती. या प्रकरणातील फरार आरोपीला अखेर बारामती पोलिसांनी अटक केली आहे.



या घटनेत कांचन साक्षर भोसले (वय ३८ रा.सोनगाव) या गंभीर जखमी झाल्या होत्या. या प्रकरणी नियोजन संदीप भोसले (रा. सोनगाव) याच्याविरोधात डिसेंबर २०२५ रोजी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी आपल्या राहत्या घरी असताना आरोपीने घराचे दार फोडून जबरदस्तीने आत प्रवेश केला. त्यानंतर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीच्या उजव्या खांद्यावर गंभीर जखम होऊन त्यांना मोठ्या प्रमाणात दुखापत झाली. घटनेनंतर फरार झाला होता. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, सहाय्यक फौजदार सुरेंद्र वाघ, पोलीस हवालदार भारत खारतोडे, तसेच पोलीस अंमलदार राजू बन्ने, मनोज पवार व जितेंद्र शिंदे यांच्या पथकाने आरोपीला अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपीस पुढील कारवाईसाठी पुण्याच्या येरवडा कारागृहात पाठविण्यात आले आहे. आरोपीवर बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत सात तर वालचंदनगर पोलीस स्टेशन हद्दीत दोन असे एकूण नऊ गुन्हे दाखल असून, त्यामध्ये चोरी व मारामारीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. आरोपी चार गुन्ह्यांमध्ये फरार होता. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास उपनिरीक्षक युवराज पाटील व पोलीस अंमलदार राजू बन्ने हे करीत आहेत.

## राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा पुरंदर येथे संपन्न

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**पुणे :** समाज कल्याण विभागाअंतर्गत ९२ शासकीय निवासी शाळा व २ शासकीय सफाई कामगारांच्या मुला-मुलीच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या विकसित होण्यासाठी २ ते ३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, दिवे पुरंदर येथे आयोजित करण्यात आल्या.

उपआयुक्त विजयकुमार गायकवाड, शिक्षण उपसंचालक निशाताई बंडगर, प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, सांगलीचे आयुक्त बाळासाहेब कामत, विशेष अधिकारी शालिनी प्रभे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. सह आयुक्त श्री. जाधव आणि उपायुक्त श्री. गायकवाड यांनी सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती कोचुरे यांनी तर कार्यक्रमाचे आभार श्री. लोंढे यांनी उपस्थितांचे आभार मानले. समाज कल्याण विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, गृहप्रमुख, गृहपाल, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यातील दिव्यांग शाळेचे क्रीडा शिक्षक पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

सांघिक क्रीडा प्रकारात १४ वर्षांखालील गटात खो-खो माये नाशिकचा संघ विजेता तर नागपूर संघ उपविजेता ठरला. फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद लातूर संघाने तर छत्रपती संभाजीनगर संघाने उपविजेतेपद मिळविले. ४०० रिले क्रीडाप्रकारात प्रथम विजेता नागपूर संघ, द्वितीय नाशिक संघ तर पुण्याचा संघ तृतीय विजेता ठरला. वैयक्तिक क्रीडाप्रकारात १०० मी. व २०० मी. धावण्याच्या स्पर्धेत पुण्याच्या अनुक्रमे प्रिया बोगटी व शुभांगी सानप यांनी प्रथम क्रमांक पटकाविला तर ४०० मी. धावण्याच्या स्पर्धेत नागपूरची जयश्री वैद्य प्रथम विजेती ठरली. सांघिक क्रीडा प्रकारात वर्षाखालील गटात खो-खो मध्ये नाशिकचा संघ विजेता तर पुणे संघ उपविजेता ठरला, फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद लातूर संघाने तर छत्रपती संभाजीनगर संघाने उपविजेतेपद मिळविले. ४०० मीटर रिले क्रीडा प्रकारात प्रथम विजेता पुणे संघ, द्वितीय नाशिक संघ तर छत्रपती संभाजीनगरचा संघ तृतीय विजेता ठरला, वैयक्तिक क्रीडा प्रकारात १०० मी. धावण्याच्या स्पर्धेत संभाजीनगरची आश्विनी सुनेवाड प्रथम क्रमांक मिळवला. २०० मी. व ४०० मी. धावण्याच्या स्पर्धेत अमरावतीच्या अनुक्रमे अमिता धुरंधर व धरती बेहडे यांनी प्रथन क्रमांक पटकाविला. थाळीफेकमध्ये लातूरची राधा सुरासे प्रथम तर लांबउडी स्पर्धेत पुण्याची आरती पटेकर प्रथम आली.

लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक-मुलींची शासकीय निवासी शाळा राजे हदगाव जिल्हा भंडारा नवापूर यांनी मिळवला तर भूमिका अभिनयातही नागपूर विभागानेच बाजी मारली. पुणे संघाला जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी-प्रथम क्रमांक वैयक्तिक खेळाच्या एकत्रित गुणांकानुसार प्राप्त झाला, असे सहायक आयुक्त श्री. लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## बीएआरसी-एसपीपीयू करारातून 'आकृती स्थापन

### तंत्रज्ञान, नवोपक्रम व उद्योजकतेला चालना

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**पुणे :** भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी), मुंबई आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (एसपीपीयू), पुणे यांच्यात बार्क स्पिन-ऑफ तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसारासाठी तसेच तंत्रज्ञान स्थापनेसाठी 'आकृती केंद्र' स्थापन करण्याबाबत सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. हा करार बुधवार, दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पार पडला. २००९ पासून राबविण्यात येणारा प्रगत ज्ञान आणि ग्रामीण तंत्रज्ञान अंमलबजावणी (अघठणढख) कार्यक्रम हा शहरी व ग्रामीण भागातील तंत्रज्ञानातील दरी कमी करण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. नवोपक्रम, उद्योजकता तसेच व्यवसाय आणि तंत्रज्ञानाला चालना देणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असून, सर्व स्तरांतील व्यक्तींना त्यांच्या प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक साधने, संसाधने व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आकृती केंद्र हे अए-इअठउ तंत्रज्ञानावर आधारित उत्पादनांचे प्रदर्शन, उद्योग तंत्रज्ञानाचा प्रसार, प्रशिक्षण, उत्पादन आणि विपणनासाठी व्यावसायिकदृष्ट्या स्वयं-शाश्वत सुविधा म्हणून कार्य करणार आहे. या केंद्रामध्ये निवडक अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा समावेश असून, ते विद्यार्थी, नवप्रवर्तक व स्टार्टअप्ससाठी मोफत उपलब्ध करून येणार आहे.या सामंजस्य करारावर माननीय कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी (एसपीपीयू) आणि माननीय अध्यक्ष, टीटी अँड सीडी, बीएआरसी – डॅनियल बाबू पी. यांनी स्वाक्षरी केली. यावेळी एसपीपीयूचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, सीईओ व एमडी, एसपीपीयू आरपीएफ – डॉ. अरविंद शालिग्राम, आकृती ग्रुप लीडर, टीटी अँड सीडी (बीएआरसी) – ए. भालेराव, आकृती केंद्र एसपीपीयू समन्वयक – डॉ. भावना उमरीकर, आयआयएलचे संचालक – डॉ. देविदास गोल्हार तसेच एसपीपीयू व एसपीपीयू आरपीएफचे अधिकारी उपस्थित होते. या करारामुळे विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि नवउद्योजकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा थेट लाभ मिळणार असून, संशोधनातून उद्योगनिर्मितीकडे वाटचाल करण्यासाठी नवी संधी निर्माण होणार आहे.



## पारगाव जारकरवाडी जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत

### जारकरवाडी पारगाव पंचायत समिती गणात तिरंगी लढत

**राष्ट्र सह्याद्री | प्रतिनिधी**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यात जारकरवाडी पारगाव तर्फे अवसरी बु जिल्हा परिषद चौरंगी लढत होत असून पंचायत समिती गणात तिरंगी लढत होत आहे जारकरवाडी पारगाव जिल्हा परिषद गटातुन आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे विवेक वळसे पाटील हे निवडणूक लढवत आहेत तर शिंदेंच्या शिवसेनेकडून अरूण गिरे हे निवडणूक लढवत आहेत तर भाजपाकडून किरण वाळुंज हे उमेदवार तर अपक्ष म्हणून गणेश काकडे हे उमेदवार आहेत पारगाव पंचायत समिती गणात तिरंगी लढत होत आहे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून सुनंदा ढोबळे हे उमेदवार आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून श्वेता ढोबळे हे उमेदवार आहेत तर भाजपाकडून मुक्ता तानाजी लबडे हे उमेदवार आहेत तर जारकरवाडी पंचायत समिती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून अंकिता वाळुंज हे उमेदवार आहेत तर शिवसेना ( उबाठा ) कडून रोहीणी दिलीप वाळुंज हे उमेदवार आहेत तर भाजपाकडून शैला गोरक्ष भोजने हे उमेदवार आहेत. एकुणच या जिल्हा परिषद गटात घड्याळाच्या विरोधात धनुष्यबाण, मशाल, तुतारी एकत्र येत निवडणूक लढवत आहेत आमदार दिलीप वळसे पाटील घरचा जिल्हा परिषद मतदार संघ असल्याने या जिल्हा परिषद गटाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे लोकसभा विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष, शिंदेची शिवसेना व भाजप एकत्रितपणे निवडणूका लढविल्या परंतु हे सर्व राजकीय पक्ष स्वंतत्र निवडणूक लढवत असल्याने मतदाराची विभागणी होणार आहे या मतदान विभागणीचा तोटा कुणाला होणार निकाला नंतर कळेल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने सर्व जिल्हा परिषद गटात, पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कुठलाही गाजावाजा न करता घरोघरी भेट देत पत्रके वाटली व घड्याळाच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन उमेदवार व कार्यकर्त्यांनी केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारगाव जिल्हा परिषद गटात गुरुवार ( दि. ५ ) रोजी पारगाव येथे सांगता सभा घेत उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन मतदारांना केले आहे पारगाव जारकरवाडी जिल्हा परिषद गटात साधारण पस्तीस हजार पेक्षा अधिकच मतदान असून या जिल्हा परिषद गटात एकुणच चुरशीची निवडणूक होत असल्याचे दिसून येत असून भाजपाचा किती मतदान पडते व त्याचा फटका कुणाला बसणार हे पहाण्यासाठी निकालाची वाट पहावी लागणार आहे.

द•ख•ल

## पोलीस हे.कॉ. संजय लोखंडे यांना मारहाण; दोघांवर गुन्हा

**जामखेड** : शहरातील खर्डा चौकात जामखेड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय लोखंडे यांना मारहाण झाल्याची घटना ३० जानेवारी रोजी घडली. या प्रकरणी दोन युवकांविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जामखेड पोलीस करीत आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, हेड कॉन्स्टेबल संजय लोखंडे हे सहकाऱ्यासह एका गुन्ह्याचा पंचनामा करून दुचाकीवरून पोलीस ठाण्याकडे परतत होते. यावेळी खर्डा चौकात मागून आलेल्या एका दुचाकीस्वाराने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. संबंधित दुचाकीस्वार मोबाईलवर बोलत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत समज दिली असता वाद झाला. वादाचे रूपांतर धक्काबुक्की व मारहाणीत झाले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. याप्रकरणी शाहनवाज शफीक सय्यद (वय २४) व जिशान शफीक सय्यद (वय २२), रा. टाटा टॉवर गल्ली, जामखेड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोघांना न्यायालयाने एक दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर हल्ला होणे गंभीर बाब असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वामनभाऊ विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अमरापूर** : वडुले खुर्द (ता. शेवगाव) येथील संत वामनभाऊ विद्यालयात ४ फेब्रुवारी २०२६ रोजी जिजाऊ गार्डनमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन लोकनियुक्त सरपंच मिराबाई भाऊसाहेब आव्हाड यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक किसन चव्हाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून उमेश भालसिंग, भाऊसाहेब उघडे, साहेबराव आंधळे, भाऊसाहेब आव्हाड, बाळासाहेब आव्हाड, विष्णू आव्हाड, चंद्रकांत रणमले, पांडू नागरे, पांडुरंग दातीर यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात किसन चव्हाण म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये 'कलारूपी राजहंस' दडलेला असतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे प्रभावी व्यासपीठ आहे.

या स्नेहसंमेलनात सुमारे ७० विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक, गायन, लोकगीत, भारुड, लावणी, कीर्तन व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यानगरपुणे रेल्वे डबल लाईनला तातडीने मंजुरी मिळण्याची मागणी

**अहिल्यानगर** : जिल्ह्याच्या दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अहिल्यानगरपुणे नवीन दुहेरी (डबल लाईन) रेल्वेमार्गाचा डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) तयार झाला असून, या प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. केंद्र सरकारच्या पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत पुणेनाशिक रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी विविध टप्प्यांवर काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून १३३ किलोमीटर लांबीचा अहिल्यानगरपुणे नवीन डबल लाईन रेल्वेमार्ग प्रस्तावित असून, हा मार्ग अहिल्यानगर जिल्ह्यातील भागातून जाणार आहे. या संदर्भात खासदार लंके म्हणाले की, हा प्रकल्प केवळ दोन शहरांमधील अंतर कमी करणारा नसून शेतकरी, विद्यार्थी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात थेट सकारात्मक बदल घडवणारा आहे. डीपीआर तयार होणे ही महत्त्वाची पायरी असून, आता मंजुरी व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे.

## श्रीरामपूरात महिलेकडून गुंगीच्या गोळ्या जप्त

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरातील ईराणी गल्लीत विनापरवाना, अवैधरित्या, वैदयकीय अधिकाऱ्याची शिफारस नसताना गुंगीकारक झोपेच्या नायट्रोझेपमच्या गोळ्या विक्रीसाठी स्वतःच्या घरात ठेवणाऱ्या महिलेस काल ताब्यात घेऊन तिच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील इराणी गल्ली, वार्ड नं १. श्रीरामपुर येथे डौनथ जाफर इराणी या महिलेकडे कोणतेही वैदयकीय प्रिस्क्रीप्शन नसताना गुंगीकारक औषधी गोळयांची विक्री करत आहे व सदर औषधी गोळ्या या नशा करण्यासाठी विक्री केल्या जात आहेत असल्याची माहिती मिळाल्यानुसार पोलिसांनी त्या महिलेस ईराणी गल्ली याठिकाणी तिच्या घराजवळ तिला पकडले.

ड्रोनब जाफर इराणी या महिलेच्या घराच्या दरवाज्याच्या आतील बाजुस एक प्लास्टिकची पिशवी दिसली. त्यानंतर सदर पिशवीत बारकाईने निरीक्षण केले असता त्यामध्ये औषधी गोळयाच्या स्ट्रिप्स आढळून आल्या. त्या गुंगीकारक झोपेच्या नायट्रोझेपमच्या असून त्या मी विक्रीसाठी आणालेल्या असल्याचे सांगितले. पोलिसांनी महिलेच्या ताब्यातून १ हजार ३६५ रु किमतीच्या नायट्रोपम पाकिटे, २ हजार २१६ रु किमतीच्या नायट्रोझेषम पाकिटे असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक सेबी आण्णा शिंदे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अनब जाफर इराणी श्रीरामपुर हिचेविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, १२५, २७८ प्रमाणे कायदेशीर फिर्याद गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रद्धांजली फलकावरून कर्जत नगरपंचायतीचे

# पदाधिकारी आणि विरोधकांची जुंपली...

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कर्जत** : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी काढलेले श्रद्धांजली फलक निश्चित चुकीचे असून याबाबत मुख्याधिकारी कर्जत यांनी दिलगिरी देखील व्यक्त केली आहे. या घटनेवरून राजकीय द्वेषापोटी विरोधक राजकारण करीत असून हे निंदनीय आहे. स्वर्गीय अजित पवार देशाचे, राज्याचे यासह आमच्या महायुतीचे महत्वाचे राजकीय व्यक्तीमत्व होते. त्यांच्या अकाली निधनाने आम्ही देखील व्यथित झालो आहोत.

मात्र बुधवारी कर्जतच्या राजकीय विरोधक नेत्यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यावर नाहक आरोप करीत आपली राजकीय पातळी दाखवली असल्याची प्रतिक्रिया कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले यांनी दिली. ते गुरुवारी पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना भाजपा नेते सुनील शेलार म्हणाले की, स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेळोवेळी कर्जतच्या राजकारणात निधी स्वरूपात सर्वच राजकीय पक्षास सहकार्य केले आहे. याची जाणीव आम्हांस असून केवळ अनावधानाने नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांकडून फलक काढण्याचे काम करीत असताना श्रद्धांजलीचे फलक देखील काढण्यात आले. मात्र हे लक्षात येताच कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी यासह मुख्याधिकारी यांनी तात्काळ ती मोहीम थांबवली. तसेच मुख्याधिकारी यांनी सोशल मीडियावर याबाबत दिलगिरी व्यक्त करीत प्रशासकीय चूक देखील मान्य केली. परंतु कर्जतच्या काही उतावीळ विरोधकांनी याचे राजकीय भांडवल करीत चुकीच्या पद्धतीने त्यास रंग देत आपली राजकीय पोळी भाजण्याचा डाव मांडला. वास्तविक पाहता सभापती राम शिंदे परदेशी दौऱ्यावर असताना कारण नसताना त्यांच्यावर कालच्या आंदोलनात बेछूट आणि बिनबुडाचे आरोप करण्यात आले. विरोधकांनी अशा घटनेचे चुकीचे राजकारण करू नये असे म्हंटले.

### इतर ठिकाणच्या घटनेचा राग माजी पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यावर काढला : घुले

यापूर्वी कर्जतचे मुख्याधिकारी यांनी माजी पदाधिकाऱ्यांस एका प्रश्नावरून खाली बसून माफी घेतल्याचा राग त्यांनी आंदोलनात काढला. बुधवारचा रास्तारोको हा स्वर्गीय अजित पवार यांच्या फलकाबाबत करण्यात आला होता. या महाशयांनी त्यास बगल देत आपली सत्ता कशी गेली यावर भाष्य करण्यात धन्यता मानली. वास्तविक पाहता याबाबत कर्जत नगरपंचायतीने दिलगिरी व्यक्त करीत श्रद्धांजली फलक काढण्याबाबत कोणताही राजकीय हेतू नव्हता हे स्पष्ट केले होते. मात्र सत्तेशिवाय न जगणाऱ्या माणसाला कोणत्याही गोष्टीत राजकारण करण्याची सवय असून भविष्यात यास आम्ही देखील जसास तसे उत्तर देऊ असे सचिन घुले यांनी इशारा दिला.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष अनिल गदादे, उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांनी देखील रास्तारोको आंदोलनात सभापती राम शिंदे यांच्यावर आरोप करणाऱ्या नेत्यांचा समाचार घेतला. यावेळी नगरसेवक प्रसाद ढोकरीकर, भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे, सतीश पाटील, देवा खरात, रवी सुपेकर, लालासाहेब शेळके, शहराध्यक्ष अमोल भगत उपस्थित होते.




## शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया : शिंदे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील नवजीवन माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इ १२ वी कला वाणिज्य व विज्ञान या शाखेतील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ पार पडला

या कार्यक्रमा चे अध्यक्ष जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहीगाव ने चे प्रशासकीय अधिकारी श्री कारभारी नजन यांनी भूषविले . प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे माजी प्राचार्य सुनील शिंदे यांनी आपल्या मनोगतातून आजच्या विद्यार्थ्यां समोरील आव्हाने व कष्ट करण्याची गरज या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.रमेश खैरे यांनी एच.एस.सी. बोर्ड परीक्षा २०२६ याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना व परीक्षेस शुभेच्छा दिल्या. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष कारभारी नजन यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले या प्रसंगी शिक्षकांच्या वतीने प्रा.मकरंद बारगुजे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे देखील या वेळी विद्यालयाचे ऋण आपल्या मनोगतातून व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्र संचालन इ ११ वी ची विद्यार्थिनी गायत्री टाक व वेदिका खंडांगळे यांनी केले या कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षक प्रा.बाळासाहेब मंडलिक प्रा. विजय घुले व सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## सरपंचपदाच्या पदभार फटाक्यांच्या आतषबाजीत

# अखेरचे पाच दिवस माझ्यासाठी पाच वर्षांसारखे : सागर मुठे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**माळवाडगांव** : मुठेवाडगांव ग्रामपंचायतचे सरपंच सागर मुठे यांच्या अपात्रेस संभाजीनगर उच्च न्यायालयाने २ फेब्रुवारी रोजी स्थगिती दिल्यानंतर आज दि.५ रोजी ग्रामपंचायत अधिकारी यांना अधिकृत आदेश प्राप्त झाल्यानंतर सागर मुठे यांनी आपल्या सहकाऱ्यासमवेत फटाक्यांच्या आतषबाजीत मोठ्या उत्साहात पदभार स्वीकारला.पंचवार्षिक निवडणूकीची मुदत १० फेब्रुवारी २०२६ संपत असुन दि. ११ रोजी प्रशासक येणार आहे.पदभार स्विकारल्यानंतर हे अखेरचे पाच दिवस माझ्यासाठी पाच वर्षासारखे आहे.कारण या पाच दिवसांच्या कार्यकालाने मी सलग पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण करत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सरपंच सागर मुठे यांनी सांगितले.

सरपंच सागर मुठे पुढे म्हणाले की फेब्रुवारी २०२१ मध्ये पार पडलेल्या पंचवार्षिक निवडणुकीत ९ पैकी आमच्या पॅनललला ५ तर विखे मुरकुटे पॅनललला ४ जागा मिळाल्या. सरपंच पदाचे दावेदार असलेले डॉ शंकर मुठे यांचा मी ७७ मतांनी पराभव करून सरपंच पदी विराजमान झालो. डॉ शंकर मुठे यांचे सरपंच पदाचे स्वप्न साकार होऊ शकले नाही.त्यांनी लोकशाहीत लोकमताचा आदर करण्या ऐवजी सव्वा महिन्याचे आत माझ्यामागे लागले. परंतु संत तुळशीराम बाबांच्या आशीर्वादाने व न्याय देवदेवतेच्या साक्षीने माझ्यावर दोन वेळा आणलेला अविश्वास ठराव बारगळला.

राजकीय दबावामुळे खोटेनाटे शिवरस्ता अतिक्रमण प्रकरणात अडकून अपात्र ठरविण्यातचाही प्रयत्न करण्यात आला.

गावचे श्रध्दास्थान असलेल्या संत तुळशीराम बाबांचा नुकताच पार पडलेला पुण्यातिथी उत्सव काळात प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण काळात ध्वजारोहण कुणी करायचे यावरूनही प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, सोसायटी मध्ये वाद निर्माण करण्यात आला. पुण्यातिथी उत्सव पर्वकालात हे डॉ शंकर मुठे यांचे कृत्य बाबांनाही पटले नसावे. अँड अजित काळे,साक्षी काळे, अँड जंजिरे यांच्या सहकार्याने संभाजीनगर उच्च न्यायालयाने पाच दिवस दिलेली स्थगिती माझा पाच वर्षांची टर्म पूर्ण करत असल्याचा मनस्वी आनंद असुन यापुढेही आदर्श गांवच्या संकल्पनेतून गांवचा सर्वांगिण विकास सुरूच ठेवेल असे शेवटी सरपंच सागर मुठे म्हणाले.

# विद्यार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे : राजगुरु

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव** : विद्यार्थ्यांनी इ.बारावी बोर्ड परीक्षेला अभ्यासपूर्णरित्या व आत्मविश्वासाने सामोरे जावे असे प्रतिपादन निरज राजगुरू साहेब (उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगाव ) यांनी केले. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे, आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय शेवगाव येथे, इ. बारावी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी आयोजित शुभेच्छा समारंभ प्रसंगी ते बोलत होते .यावेळी व्यासपीठावर आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, शिक्षण विभाग सहप्रमुख प्रा .अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक रविंद्र आगळे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

राजगुरू साहेब आपले विचार व्यक्त करताना पुढे म्हणाले ,की विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या काळात आपला आहार व आरोग्याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांनी जर बारावी पासून पदवीपर्यंत अभ्यासात सातत्य ठेवले ,मेहनत केली तर भविष्यात नक्कीच यश मिळेल. विद्यार्थ्यांनी स्वत:मधील क्षमता ओळखाव्यात असेही ते म्हणाले.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ .लक्ष्मण बिटाळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले ,की निरोप समारंभाचा कार्यक्रम हा महाविद्यालयातील आठवणींना उजाळा देत भविष्याची स्वप्ने पाहण्याचा कार्यक्रम आहे .जगात तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी गुणवत्तेशिवाय पर्याय नाही. भविष्यात ज्या क्षेत्रात जातान तेथे अग्रस्थानी रहा असेही ते म्हणाले. संस्थेच्या वतीने बारावी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी परीक्षेसाठी व भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थी मनोगतात आरती धावणे, साक्षी मगर, राधा बोडखे, साक्षी निकम , श्रद्धा जाधव, संग्राम काळे यांनी कनिष्ठ महाविद्यालय व सर्व प्राध्यापकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. संपत दसपुते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, की विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तुंग यश मिळवून कनिष्ठ महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख यांनी तर आभार प्रा. अनिल जगताप यांनी मानले.

## अवैध दारू व्यवसायांसह वाहनांवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : गेल्या काही महिन्यांपासून लोणी पोलीस क्शन मोडवर दिसत असून एपीआय कैलास वाघ यांनी परिसरात कारवायांचा धडाका लावला आहे. नुकतेच लोणी बुद्रुक येथील हॉटेल सागर व लोणी खुर्द परिसरातील वेताळबाबा चौक येथील हॉटेल लकी या ठिकाणी अवैध दारू विक्री विरोधात कारवाई करून आरोपी नामे रमेश भुजबळ राहणार लोणी बुद्रुक व

लतिफ अमीन शेख, रा.लोणी खुर्द यांना ताब्यात घेतले आहे.

सदर आरोपी विरोधात दारूबंदी कायदा कलमानुसार कारवाई करण्यात आली आहे. तसेच लोणी बुद्रुक येथील हसनापूर चौकामध्ये नाकाबंदी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण २२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत विना नंबर प्लेट,चार चाकी वाहनांना काळ्याकाचा,कर्णकर्कश बुलेटचे सायलेन्सर, यांचा समावेश आहे. कारवाईत एकूण १७,६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सदर कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांकडून लोणी पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक, सोमनाथ वाकचौरे, डी वाय एस पी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी.कैलास वाघ, पीएसआय आशिष चौधरी, बाबा सांगळे, हेड कॉन्स्टेबल सोमनाथ गाडेकर, कल्याण काळे, रवींद्र मेढे, निलेश सातपुते, नऱ्हे यांच्या पथकाने केली आहे.

## विद्यार्थ्यांनी अष्टपैलू व्यक्तिमत्व बनवावे : मुटकुळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**शेवगाव** : प्रत्येक विद्यार्थ्यांना आपले आई वडिल कष्ट करून शिक्षण देतात एक सुजान नागरिक बनावे यासाठी प्रयत्न करत असतात. पण सध्या युवकांमध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त आढळून येते. त्यास विद्यार्थ्यांनी बळी न जाता मार्गक्रमण करावे. विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क, अधिकार आहे. विद्यार्थी हा देशाची युवा शक्ती आहे. महाविद्यालयीन जीवन जगत असताना विद्यार्थ्यांच्या सर्व कलागुणांना वाव मिळतो त्या संधीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी अष्टपैलू होण्याचा प्रयत्न करावा सांगून शेवगाव येथील पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या ते शेवगाव येथील न्यू आर्ट्स महाविद्यालयातील आयोजित विविध गुणदर्शन समारंभात बोलत होते. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते नटराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून झाली. या कार्यक्रमात प्रथम गणेश वंदना झाली या कार्यक्रमात एकूण ४० विविध कला गुणांचे कार्यक्रम सादर झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, भाऊसाहेब अडसरे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. गोकुळ मुंढे, कार्याध्यक्ष प्रा. अनिल काळे, डॉ. रवींद्र वैद्य, डॉ. गोकुळ क्षीरसागर, प्रा. आशा वडणे, प्रा. मिनाक्षी चक्रे प्रा. कल्याणी बहिरट, प्रा. सुशीलकुमार शिंदे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गहिनीनाथ शेळके आणि प्रा. मोहिनी जाधव यांनी केले तर आभार डॉ. गोकुळ मुंढे यांनी केले.

# जिल्ह्यातील ४३७ विहिरींच्या दुरुस्तीसाठी ६३ लाखांचा निधी मंजूर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यात सन २०२५२६ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय शासनाने घेतला असून जिल्ह्यातील ४३७ शेत विहिरींच्या दुरुस्तीसाठी ६३ लाख १० हजार ६८३ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सहा शेतकऱ्यांना धनादेश देऊन करण्यात आले.

खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक शेत विहिरी गाळाने बुजल्या, तर काही ठिकाणी विहिरी कोसळून मोठे नुकसान झाले होते. परिणामी रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला होता. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या नियोजन विभागाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अतिवृष्टीबाधित विहिरींसाठी आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयानुसार विहीर दुरुस्तीसाठी प्रत्यक्ष खर्च किंवा कमाल ३० हजार रुपये, यापैकी कमी असलेली रक्कम शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयास गटविकास अधिकाऱ्यांकडून प्राप्त अहवालानुसार पहिल्या टप्प्यात ४३७ विहिरी पात्र ठरल्या आहेत. यामध्ये जामखेड तालुक्यातील १२८ विहिरींसाठी १८ लाख ६८ हजार ७८ रुपये, शेवगावमधील १११ विहिरींसाठी १६ लाख ४८ हजार २०६ रुपये, राहुरीतील ४९ विहिरींसाठी ७ लाख ३२ हजार ८४४ रुपये, श्रीरामपूरमधील ४६ विहिरींसाठी ६ लाख ६० हजार ६०३ रुपये, नेवासा येथील ४३ विहिरींसाठी ५ लाख १० हजार ८६४ रुपये, संगमनेरमधील २१ विहिरींसाठी ३ लाख १४ हजार ७६ रुपये, कोपरगावच्या १२ विहिरींसाठी ४ लाख ४ हजार ४०० रुपये तर पारनेरच्या १२ विहिरींसाठी १ लाख ७१ हजार ६१२ रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या प्रसंगी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी उर्वरित पात्र लाभार्थ्यांना १५ फेब्रुवारीपर्यंत निधीचे वाटप पूर्ण करण्याचे निर्देश दिले. कार्यक्रमास कृषी, आत्मा, पशुसंवर्धन विभाग तसेच जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार, दि.०७ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## बेलापूरला उद्या केशव गोविंद जन्मोत्सव सोहळा

**बेलापूर :** येथील ग्रामदैवत श्री. हरिहर केशव गोविंद भगवान यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त रविवार दि. ८ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी सात वाजता श्रींना विधिवत अभिषेक, आठ वाजता पालखी मिरवणुक, अकरा वाजता प्रदिप महाराज गोसावी यांचे प्रवचन, दुपारी एक वाजता महाआरती आणि त्यानंतर महाप्रसाद असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. बेलापूर बुद्रुक येथील श्री. हरिहर केशव गोविंद मंदिरात संपन्न होणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमांचा गाव आणि परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ह. भ. प. सोपानबुवा हिरवे, श्री. हरिहर केशव-गोविंद भगवान जन्मोत्सव समिती बेलापूर - ऐनतपुर ग्रामस्थ व समस्त भजनी मंडळानी केले आहे.



# महानगरपालिकेच्या महापौरपदी ज्योती गाडे तर उपमहापौरपदी धनंजय जाधव बिनविरोध



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत महापौर व उपमहापौर पदांची निवड प्रक्रिया आज जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या निवडणुकीत महापौरपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्योतीताई अमोल गाडे, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे धनंजय कृष्णा जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

महापौर पदासाठी सूचक नगरसेवक गणेश भोसले आणि अनुमोदन नगरसेवक अविनाश घुले, तर उपमहापौर पदासाठी सूचक निखिल वारे आणि अनुमोदन कुमार वाकळे यांनी प्रस्ताव मांडला. निवड प्रक्रिया शांततेत आणि उत्साही वातावरणात पार पडली.

कार्यक्रमास महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, नगरसचिव मेहर लहारे, तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, महापालिका प्रशासन आणि पदाधिकारी यांनी एकत्रितपणे कार्य केल्यास शहराच्या विकासाला गती मिळेल. पार्किंग व वाहतूक व्यवस्थेचे प्रश्न गंभीर असून त्यावर जिल्हा प्रशासन, आरटीओ आणि महानगरपालिका यांनी संयुक्तपणे उपाययोजना राबवाव्यात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज व बॅनर्स हटवावेत, जेणेकरून नागरिकांमध्ये चांगला संदेश जाईल. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी नगरकरांचा विश्वास संपादन करणारे काम उभे करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

नूतन महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या पहिल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, आजपासूनच कार्याची सुरुवात करत असून शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू. अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्शावर आधारित विकासाचा आराखडा उभा करू, असे त्या म्हणाल्या.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी सांगितले की, महापौर ज्योतीताई गाडे व आम्ही सर्वजण एकत्र येऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन लोकाभिमुख निर्णय घेत नगरकरांची सेवा करणे, हीच माझी प्राथमिकता असेल, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी सर्व नगरसेवकांचे व नागरिकांचे आभार मानले तसेच सभागृहाच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजलीही वाहिली.

या वेळी आमदार संग्राम जगताप माजी नगरसेविका शितलताई जगताप माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, संपत बारस्कर, कुमार वाकळे, अविनाश घुले, मनोज कोतकर, डॉ. सागर बोरुडे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, महेश तवले आदी मान्यवर उपस्थित होते.



**नेवासा :** श्री. मोहिनीराज यात्रोत्सवाच्या निमित्ताने दैनिक राष्ट्र सह्याद्रीने प्रकाशित केलेल्या विशेष अंकाचे प्रकाशन मंदिर परिसरात करण्यात आले. भाविकांनी या विशेष अंकाचे स्वागत केले. मातोश्री साखरबाई नवले यांच्या हस्ते मोहिनी राजांच्या चरणी अंक अर्पण करण्यात आला. श्री मोहिनीराज देवस्थानचे भालचंद्र बडवे, जयेश बडवे, रविंद्र जोशी, जयंत देवचक्के, रविंद्र मुनोत यांच्यासह मुळा कारखान्याचे चीफ इंजिनिअर दीपक नवले, राधा नवले, ऐश्वर्या नवले, नेवासा तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण यांच्यासह भाविक उपस्थित होते.

### सिकची, डावरे, खटोड, साळुंखे, सोमाणी बोगस सभासद
## बेलापूर एज्युकेशन सोसायटीचा वाद पालकमंत्री विखेंच्या कोर्टात

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे तसेच शिक्षकांवर धाक निर्माण व्हावा याबरोबरच धर्मादाय कार्यालयातील चौकशी पूर्ण होईपर्यंत बेलापूर एज्युकेशन सोसायटीवर तातडीने प्रशासक नेमण्यात यावा, अशी मागणी राजेंद्र मदनलाल सिकची(लांडगे), शिवदास नारायण पाटील महाडिक, सत्यनारायण शिवनारायण माहेश्वरी, सुभाष हरकचंद बोरा, श्रीकांत सुभाष राठी, आणि विजय गणपतलाल मुथ्था यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे केली आहे.

राजेश हरिनारायण खटोड, शरद रामबिला सोमानी, दीपक बन्सीलाल सिकची, भरत अशोक साळुंखे, रवींद्र मुरलीधर खटोड, शेखर डावरे हे संस्थेचे ट्रस्टी नाहीत यावरून बेलापूर एज्युकेशन सोसायटीभोवती गेल्या दोन वर्षांत उभा राहिलेला कायदेशीर वाद आता अधिकच गंभीर वळणावर आला आहे.

शरद रामविलास सोमाणी यांनी अनेक वर्षे स्वतःला 'बन्सीलाल रघुनाथ दास झंवर' या चॅरिटेबल ट्रस्टचा प्रतिनिधी म्हणून संस्थेच्या कामकाजात सहभाग घेतला. मात्र २०२३ मध्ये सभासदांनी सहाय्यक धर्मादाय कार्यालयातून माहिती घेतली असता झंवर ट्रस्टचे संस्थापक ट्रस्टी मयत असून १९६९ नंतर कोणतीही नवी नियुक्ती नोंदीत नसल्याचे समोर आले आहे.

नुकतेच तथाकथित झंवर ट्रस्ट कडून सहायक धर्मादाय आयुक्त अहिल्यानगर यांचेकडेस सन १९७० पासून ते सन २०२५ पर्यंतचे बदल अहवाल म्हणजेच चेंज रिपोर्ट बदल अहवाल क्रमांक ८०९ ते ८२७ असे एकूण १९ चेंज रिपोर्ट मंजुरीकामी सुमारे ५८ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर दाखल केले गेले आहेत. यावरून शरद सोमाणी यांचा झंवर ट्रस्टीशी काडीमात्र कायदेशीर संबंध नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

शिक्षण क्षेत्रातील संस्थेत निर्माण झालेला हा पेच केवळ व्यवस्थापनापुरता मर्यादित नसून संस्थेची प्रतिष्ठा, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित असल्याने व शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांवर कुणाचाही धाक आणि वचक न राहिल्याने त्याचा शैक्षणिक दर्जावर परिणाम होत असल्याचे विद्यार्थ्यांचे पालक आणि तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

दरम्यान जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी धर्मादाय आयुक्त यांच्याकडून न्याय देण्यास विलंब होत असून आता पालकमंत्री राधाकृष्ण विखे या संदर्भात काय भूमिका घेतात याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## खडांबेत ५२ वर्षीय इसमाची गळफास घेऊन आत्महत्या!

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथील एका ५२ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना समोर आली.



विनायक पुंजाराम पारे, वय ५२ वर्षे, रा. खडांबे खुर्द, ता. राहुरी असे मृत व्यक्तीचे नाव आहे. दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे २.४५ वाजेच्या सुमारास विनायक पारे यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. त्यांना तातडीने वांबोरी येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून उपचारा पूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे स. फौ. बबन राठोड यांनी रुग्णालयात धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या घटनेमुळे खडांबे खुर्द परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स. फौ. बबन राठोड करत आहेत.

### बलात्कार प्रकरणी पोलीस ॲकडमी चालकाला
## पाच दिवसांची पोलीस कोठडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पुणे जिल्ह्यातील एक युवती पोलीस दलात आपले करिअर घडवण्यासाठी श्रीगोंदा येथील रनर्स क्लब अॅकॅडमी मध्ये भरती झाल्यावर अॅकॅडमी चालकाने तिच्याशी जवळीक साधून वारंवार बलात्कार करत जबरदस्तीने गर्भपात केल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(एम)(एफ), ७५(१), ८८, ३५१(१) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आल्यावर यातील आरोपी सकाळी ६ वाजता स्वतः हून पोलीस ठाण्यात हजार झाला. त्यास न्यायालयाने ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पुणे जिल्ह्यातील एक युवती उच्च शिक्षण घेण्यासाठी श्रीगोंद्यातील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय श्रीगोंदा या ठिकाणी शिक्षण घेत असताना पोलीस भरतीचा सराव व्हावा यासाठी तिने श्रीगोंद्यातील जावेद शेख यांची रनर्स क्लब अॅकॅडमी जॉइन केली. डिसेंबर २०२४ पासून तिच्यावर वेळोवेळी बलात्कार केला. त्यातून जानेवारी २०२५ मध्ये फिर्यादीच्या पोटात अचानक दुखू लागल्यानंतर ती उपचारकामी श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात गेली असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता ती गर्भवती असल्याचे तिला समजले. त्यावेळी तिने फोन करून आरोपी जावेद शेख यास गर्भवती असल्याचे सांगितले. त्यावेळी जावेद व त्याचा अज्ञात मित्र यांनी गर्भपाताच्या गोळ्या दिल्यावर तिचा गर्भपात झाला अश्या आशयाच्या हकीगतेवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(एम)(एफ), ७५(१), ८८, ३५१(१) अन्वये जावेद शेख यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्यावर हि माहिती आरोपीला समजताच आरोपी स्वतः हून सकाळी ६ वाजता पोलीस ठाण्यात हजत झाला आहे त्यास न्यायालयाने ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे करत आहेत.

### क्रीडा संकुलाच्या जागेचा वाद?

तालुक्याच्या बाहेरून येऊन श्रीगोंद्यात येऊन जावेद शेख यांनी रनर्स क्लब नावाची अॅकॅडमी पेडगाव रोडवरील सरकारी क्रीडा संकुलाच्या जागेवर चालवली जात होती. ती जागा इतर करिअर अॅकॅडमी चालकांना हवी होती, यामुळेच यातून हा गुन्हा दाखल झाल्याची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे. त्यामुळे पोलिसांनी या अंगाने तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

-------------

### श्रीगोंद्यात गर्भपाताच्या गोळ्या दिल्या कोणी?

वैद्यकीय अधिकाऱ्याच्या चिठ्ठीशिवाय गर्भपाताच्या मेडिसिन देण्यास कायदेशीर बंदी असतानाही श्रीगोंद्यात गर्भपात करण्यासाठी लागणाऱ्या मेडिसिनची खुलेआम विक्री केली जात असल्याचे या प्रकरणातून समोर आले आहे त्यामुळे गर्भपात करण्यासाठी विनाचिठ्ठी मेडिसिन देणारा मेडिकल चालकाला पोलीस आरोपी करणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## आरटीओकडून 'ब्लॅकआउट' कारवाई
### ४५८ वाहनांवर ६.५ लाखांचा दंड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** वाहनांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या आणि कायद्याने बेकायदेशीर ठरविण्यात आलेल्या वाहनांवरील 'ब्लॅक फिल्म' विरोधात अहिल्यानगर जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन विभागाने पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने जोरदार धडक मोहीम राबवली. दि.२८ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष संयुक्त तपासणी मोहिमेत तब्बल २ हजार २१ वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये दोषी आढळलेल्या ४५८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून,६ लाख ४६ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी दिली.

या मोहिमेत अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अखत्यारितील सर्व वायुवेग पथकांनी सहभाग घेतला. याशिवाय जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील मोटार वाहन निरीक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षकांच्या पथकांनी संयुक्तरित्या कारवाई करत वाहनांची कसून तपासणी केली. तपासणी दरम्यान समोरील (दर्शनी) काच व वाहनांच्या खिडक्यांवर बेकायदेशीर ब्लॅक फिल्म आढळलेल्या ४५८ वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली.

आकारण्यात आलेल्या एकूण ६ लाख ४६ हजार रुपयांच्या दंडापैकी आतापर्यंत ३७ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच संबंधित वाहनांवरील ब्लॅक फिल्म्स तात्काळ काढून टाकण्याची कार्यवाहीही करण्यात आली.या विशेष मोहिमे दरम्यान केवळ ब्लॅक फिल्मपुरतीच मर्यादा न ठेवता इतर नियमभंगांची देखील तपासणी करण्यात आली.यात वैध विमा नसलेली वाहने, नोंदणी प्रमाणपत्र किंवा वाहन परवाना नसणे,वाहन चालवण्याचा परवाना नसणे,वाहनांतील दिव्यांमधील त्रुटी तसेच वायू प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली.




